सोमवार, २५ सप्टेंबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ५४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 25 SEPT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-54 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# फडणवीसांकडून नुकसानीची पाहणी

## १० हजारांहून अधिक घरे, दुकानांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : उपमुख्यमंत्री आणि नागपुरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. अंबाझरी तलाव परिसरातून त्यांच्या पाहणी दौऱ्याला सुरुवात झाली. दागा लेआऊटमध्ये देखील फडणवीसांनी नुकसानाचा आढावा घेतला. पूरग्रस्त इमारतींमध्ये पाहणी करताना काही रहिवाशांनी प्रशासनाबाबत नाराजी देखील व्यक्त केली. नाग नदी परिसरात ढगफूटीसदृश पाऊस झाल्याने नागपुरात पूरस्थिती निर्माण झाले. अंबाझरी तलावही ओव्हर फ्लो झाल्याने शहरांत पाणी शिरले आतापर्यंत तीघांचा मृत्यू तर 10 हजारांहून अधिक घरे आणि दुकानांचे नुकसान झाले आहे.**



पूरस्थितीमागच्या अनेक संभाव्य कारणांपैकी एक कारण समोर आले आणि ते म्हणजे शासकीय यंत्रणांच्या विविध विकासकामांमुळे नाद नदीच्या प्रवाहाला जागोजागी अडथळे निर्माण झाले आहेत. यामुळे अनेक ठिकाणी नदीनं आपला प्रवाह बदलल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे सीताबर्डी, धांतोली मार्केटमध्ये पाणी शिरलं आणि नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. फडणवीस म्हणाले, नागरिकांचे मोठ्या प्रमाणात झालेला आहे. नागरिकांना जास्तीत जास्त मदत त्यांना केली जाईल. नागपुरात झालेला पाऊस हा नेहमीपेक्षा अधिक पट जास्त होता. प्रत्येक आपत्ती काहीतरी शिकवून जातो त्यामुळे आता तशी व्यवस्था केली जाईल. नागपूर शहरात 10 हजार घराचं नुकसान झालं आहे. त्यांना योग्य ती मदत केली जाईल. काल झालेला पाऊस अधिक प्रमाणात होता त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली नागपूर विमानतळ परिसरामध्ये 111 मिमी पावसाची नोंद झाली, तर सीतीबर्डी परिसरामध्ये देखील 111 मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. पार्डी भागामध्ये 103 मिमी पावसाची नोंद झाली. तसेच वाडी परिसरामध्ये सर्वाधिक 229 मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. रात्रीपासून नागपुरात सुरु असलेल्या पावसाने शनिवार सकाळपासून थोडी विश्रांती घेतल्याचं पाहायला मिळतय. पावसाने जरी उसंत घेतली असली तरीही नागपूरच्या सीताबर्डी , धंतोली मार्केट मधील काही दुकानांमधील पाणी अजूनही ओसरलं नाही. अजूनही अनेक इलेक्ट्रॉनिक साहित्याची दुकाने, हॉटेलमध्ये पाणी भरले आहे. नागपूर महानगर पालिकेचे पथक युद्ध पातळीवर पाण्याचा निचरा करण्याचा प्रयत्न करत असल्याचं सांगण्यात येत आहे. मात्र अजूनही अनेक दुकानातील पाणी ओसरले नाही.

बुलढाणा : घाटाखालील नांदुरा तालुक्याला अतिवृष्टीचा जबर तडाखा बसला आहे . पावसाने तब्बल ११६ कुटुंब निराधार झाले असून २६ घरांची पडझड झाली आहे . याशिवाय ६७ जनावरे बेपत्ता वा दगावल्याचे प्राथमिक पाहणीत आढळून झाले .तालुक्यातील महाळुंगी ( ८४ मिमी ) व वडनेर( ८१ .५ मिमी ) महसूल मंडळात अतिवृष्टी ने थैमान घातले . यामुळे शेतात पाणी साचल्याने खरीप पिकांची मोठी नासाडी झाली आहे .

## महत्त्वाची बातमी

### सत्तेत आल्यास महिला आरक्षण विधेयकात सुधारणा : खरगे

आधुनिक केसरी न्यूज

**जयपूर :** 'आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस केंद्रात सत्तेवर आल्यास महिला आरक्षण विधेयकात सुधारणा करेल,' अशी ग्वाही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी दिली. ते म्हणाले, की या विधेयकाच्या तत्काळ अंमलबजावणीत कोणतीही मोठी कायदेशीर गुंतागुंत नसताना मोदी सरकार मात्र या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी आगामी दहा वर्षे प्रतीक्षा करायला लावणार आहे. जयपूरमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यास संबोधित करताना खरगे बोलत होते. ते म्हणाले, की संसदेत या विधेयकाला पाठिंबा देताना काँग्रेसने ते तत्काळ लागू करण्याची मागणी केली होती. तसेच त्यात इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी वेगळे आरक्षण असावे, अशी काँग्रेसची मागणी आहे. केंद्रात २०२४ मध्ये आमचे सरकार जेव्हा येईल, तेव्हा आम्ही सर्वप्रथम या विधेयकात तशी सुधारणा करू. केंद्र सरकारने अनुसूचित जाती-जमातींना काय महत्त्व दिले? संसदेच्या नवीन इमारतीच्या पायाभरणीसाठी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना ते दलित असल्याने निमंत्रित करण्यात आले नव्हते, असा आरोपही खरगे यांनी यावेळी केला. मी अनुसूचित जाती-जमाती आणि मागासवर्गीयांना हा प्रश्न विचारतो, ही काही त्यांना काही प्रतिष्ठा दिली जाते का? लोकसभा अधिवेशन पंतप्रधान नव्हे तर राष्ट्रपती बोलावतात. पण राष्ट्रपतींनाच येथे आदराचे स्थान नाही. आम्ही महिलांचा खूप आदर करतो, असा मोदींचा दावा कशाच्या आधारे आहे?




# आरक्षण नव्हे उत्तम शिक्षणासाठी मोर्चे निघायला हवेत : प्रा. बालाजी चिरडे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नविन शैक्षणिक धोरण हे नव्या युगाच्या दिशेने टाकलेले सर्वोत्तम पाऊल असून उत्तम कौशल्य आमच्या हाताला मिळायला हवेत की आरक्षणाच्या दिशेनी आपण जायचं हे आजच्या तरुणाईने ठरवायला हवं. तरुणाच्या हाताला काम देणाऱ्या योजना यायला हव्यात. त्यामुळे आत्ताच्या तरुणांनी आरक्षणाचे मोर्चे काढण्यापेक्षा उत्तम शिक्षणासाठी मोर्चे निघायला हवेत असे मत महात्मा गांधी हिंदी विश्वविद्यालय, विद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक बालाजी चिरडे यांनी व्यक्त केले.


सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर चे संस्थापक अध्यक्ष, माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री , चंद्रपूर भुषण शांताराम पोटदुखे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. या कार्यक्रमाला सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष सुधाताई पोटदुखे, सचिव प्रशांत पोटदुखे, चंद्रपूर विधानसभेचे आमदार तथा कार्यकारिणी सदस्य किशोर जोरगेवार, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दिक्षित, जिग्नेश पटेल आणि मुख्य वक्ता म्हणून प्रा. बालाजी चिरडे आदिंची उपस्थिती होती. भारतीय राजकारणाची अमृत महोत्सवी वाटचाल - एक दृष्टिक्षेप या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत बोलतांना प्रा. चिरडे यांनी स्वातंत्र्यपूर्वीचा भारत , स्वातंत्र्यानंतर आपल्याला मिळालेला भारत त्यावेळेस असलेली परिस्थिती अशा परिस्थितीत तत्कालीन पंतप्रधानांनी घेतलेले निर्णय यावर सोदाहरण दाखले देत प्रकाश टाकला. जगातील सर्व देश हे एक धर्मिय एक भाषीय देश आहेत परंतू भारत हा एकमेव असा देश आहे की जो सर्वधर्मीय, सर्व भाषीक आणि विविध प्रांतात विखुरलेला असा देश आहे. आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आणि त्यानंतरही अनेक राष्ट्र स्वातंत्र झालेत आज त्यांची अवस्था काय आहे आणि आपली अवस्था काय आहे याचा विचार आपण करायला हवा. स्वातंत्र्य मिळेल तर भाकरी मिळणार नाही आणि भाकरी मिळाली तर स्वातंत्र्य मिळणार नाही. अशी जगातील काही राष्ट्रांची अवस्था होती. पण भारत हा एकमेव देश आहे की जिथे स्वातंत्र्यही मिळालं आणि भाकरीही मिळाली.

आ . किशोर जोरगेवार यांनी शांताराम पोटदुखे यांच्यासारखे संस्थाचालक आजच्या काळात मिळणे अशक्य असुन शांतारामजींनी त्यांच्या जीवनपद्धतीतून दिलेला विचार पुढे नेण्याचं काम आपल्याला करायचं आहे . चांगल शिक्षण घेत असतांनाच आजच्या तरुणाई समोर चांगल्या लोकांचे चरित्रही यावेत यासाठी या व्याख्यानमालेचे आयोजन केले असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले . शिक्षण सगळ्यांनाच मिळते पण दर्जेदार शिक्षणासाठी शांताराम पोटदुखे झिजले आहेत त्यांचा हाच आदर्श पुढे नेण्याचा प्रयत्न आपण सगळे मिळून करुया असे आवाहन त्यांनी यावेळी केले .

स्वातंत्र्यानंतर एक कोटी लोकांच निर्वासन करणं , देशाला एक घटना देणं हे महत्वाच काम तेव्हा या देशात करण्यात आलं. आजूबाजूला भयावह परिस्थिती असतांना भारतात मात्र लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार हा देश चालवत आहेत. शिवाय महिलांना देखील स्वातंत्र्यानंतर लगेच मतदानाचा अधिकार मिळाला . विकसित म्हणणाऱ्या युरोप मधे आत्ता आत्ता महिलांना मतदानाचा अधिकार मिळालाय याचा विचार आपण करायला हवा. असा विषय मांडत पंडित जवाहरलाल नेहरू , लाल बहादूर शास्त्री , ईंदिरा गांधी , त्यांनी लावलेली आणीबाणी, बँकांच केलेलं राष्ट्रीयीकरण, नसबंदी , ऑपरेशन ब्ल्यु स्टार , तनखाबंदी यावर सुद्धा अस्खलित पणे आपले मत मांडतांना अटल बिहारी वाजपेयी यांचे तेरा दिवसीय व त्यानंतर आलेले तेरा महिन्यांचे सरकार , हे सरकार निर्माण होण्याची तत्कालीन पार्श्वभूमी , राजीव गांधी यांची हत्या , रशियाचे विघटन , देशाने गहाण टाकलेलं सोनं , बदलत गेलेली प्रसार माध्यमांची भुमिका , भारतीय राजकारणाचा कालानुरूप बदलत गेलेला पोत , शायनिंग ईंडिया , फिल गुड ईंडिया , विकसित देशाच्या दिशेने सुरु झालेली वाटचाल, गुगल पे , फोन पे च्या माध्यमातून साध्या भाजीबाजारात होत चाललेले व्यवहार असा सर्वांगीण विषय उपस्थितांसमोर मांडला. नविन शैक्षणिक धोरण हे विकसित देशाच्या दिशेने उचललेले सर्वोत्तम पाऊल असुन यातून होणारी कौशल्य निर्मिती ही तरुणाई ला नौकरी मागण्यासाठी नाही तर स्वयंरोजगारातून विकास घडवून आणेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

माणसाच्या हातात पैसा आला खरा, पण एकंदरीत माणूसच या व्यवस्थेचा एक भाग होऊन गेला. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर तो एक चालतेबोलते यंत्र झाला. या गोष्टीला आजची औद्योगिक, भांडवलशाही व्यवस्था कारणीभूत आहे असं मला वाटतं कारण या व्यवस्थेत माणूस महत्वाचा उरला नाही. महत्वाचं झालं आहे ते उत्पादन. या व्यवस्थेच्या केंद्रस्थानी माणूस नाहीच. माणसाची गरज नसेल तर ही व्यवस्था माणसाला सरळ बाहेर फेकते. ' आता कंपनीला तुमची गरज नाही. तुम्ही जाऊ शकता...' असे सरळ सरळ सांगता येते. माणूस कधी नव्हे तो केवढा असुरक्षित झाला आहे. इथे त्याचा, त्याच्या मनाचा विचार करायला कोणालाच वेळ नाही.

दोन आंदोलनं नुकतीच आपण पाहिली. एक शेतकऱ्यांचं आणि दुसरं अजूनही सुरु एस टी कर्मचाऱ्यांचं. ही सगळी जी काही व्यवस्था नावाची गोष्ट आहे, तिला त्यांच्यातला ' माणूस ' फार उशिरा दिसला. मग ते केंद्र असो की राज्य. या सगळ्यात राजकारणही आहे. ते आपण तूर्त बाजूला ठेवू. या व्यवस्थेलामात्र नाईलाजाने त्यांच्या ' माणूसपणाची ' दखल घ्यावी लागली, जी आधीच घ्यायला हवी होती. एक आंदोलन मिटलं आहे. ' व्यवस्था ' नावाच्या या यंत्रात माणूस मात्र पिळवटून निघतो आहे. जो समाजाला योग्य दिशेने नेतो तो नेता. पण आजकाल समाजाला दिशेचं दिग्दर्शन करणाऱ्यांचीच दिशा चुकलेली आहे. ते काय योग्य दिशा दाखवणार ! स्वातंत्र्यपूर्व काळातले आणि काही काळ नंतरही असणारे ध्येयवादी, त्यागी, आदर्श नेते आता राहिले नाहीत. भ्रष्टाचारी, तुरुंगात जाऊन आलेले, वेगवेगळे आरोप असणारे विविध लोक सन्मानाची पदे भूषवताना दिसतात. समाजाची मानसिकताही बदलली आहे. हे नेते सांगतील तीच समाजाला योग्य दिशा वाटते. त्या मार्गाने समाज जाताना दिसतो आहे. सगळ्याच गोष्टीत फार ' अंतर ' पडलं आहे. नात्यांमध्येही अंतर पडलं आहे. वृद्ध आईवडील माझ्याकडेच का ? तुझ्याकडे का नाही ? दोनतीन मुलं असतील तर वर्षातले काही महिने प्रत्येकाकडे त्यांची विभागणी केली जाते. कुठेतरी ऐकलेलं ' आईवडील माझ्याकडे नाहीत, मी आईवडिलांकडे राहतो...' ही भावना केवढी उदात्त आहे ! समाजाच्या आर्थिक परिस्थितीत केवढी विषमता आली आहे ! नुकताच प्रसिद्ध झालेला आर्थिक असमानता अहवाल सांगतो की देशातील निम्म्या लोकांची वार्षिक कमाई फक्त ५०००० रु आहे.



## अंतर...



## आनंदी पहाट

## माझ्याच बाबतीत का ? हा विचारच घातक

आधुनिक केसरी

तुम्हाला ज्या बाबी अनेक दिवस, काही आठवडे किंवा त्याहूनही अधिक काळ त्रास देत असतील, तर तुमच्या मनात नकारात्मक विचार येत आहेत हे निश्चितच सत्य आहे. नकारात्मक विचारांमुळे तुम्ही उदास आणि चिंताग्रस्त होऊ लागता. राग ही देखील एक नकारात्मक भावना आहे ज्यामुळे आपल्या आरोग्यावर आणि


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानसिकतेवर सर्वात मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. विशेषतः रागावर सहजपणे नियंत्रण न मिळवू शकणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत ते प्रकर्षाने जाणवते. काहीवेळा अगदी सामान्य सर्दी, थकवा, तणाव, भूकेने होणारी व्याकुळता, झोपेची कमतरता, अगदी ऍलर्जीमुळे तुम्हाला उदासीनता येऊ शकते, त्यामुळे नकारात्मक विचार येतात. अशा प्रकारच्या अनेक कारणांमध्ये, नैराश्य हे नकारात्मक विचारांमुळेच उद्भवू शकते. सामान्य नकारात्मक संदेशांची काहीजण स्वतःच वारंवार पुनरावृत्ती करत असतात.

काहीवेळा त्यांचे विचार असे असतात कि,मी स्वतःच एक धोकादायक व्यक्ती आहे मी एक पराभूत व्यक्ती आहे मी कधीही काहीही बरोबर करत नाहीकोणीही मला कधीही आवडणार नाही मी एकमेव असा आहे कि जो अविचाराने वागतो. बहुतेक व्यक्ती या स्वरूपातील नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांवर, संदेशांवर विश्वास ठेवतात, ते कितीही असत्य किंवा आस्तव असले तरीही. आपण ते वैयक्तिकरित्या घेतले आणि आपल्याबद्दल वाईट वाटेल किंवा त्याबद्दल रागही येईल ? अशी मनाची समजूत करून घेतली तर तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींना मोठ्या गोष्टींमध्ये बदल घडवून आणत असतात. तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते.



आधुनिक केसरी

## अद्वैत स्वामी तू | या दासाचा ||

तू करूणेश्वर | तू जगदीश्वर ||
तू प्राणेश्वर | श्रीरंगा रे ||१||
तू मुरलीधर | तू कृपासागर ||
सखा निरंतर | दीनदयाळा ||२||
अनादीकालचा | आदी-अंतही तू ||
त्रिकाल सत्य तू | सर्वेश्वरा ||३||
राधेश्याम तू | मेघःशाम तू ||
आत्माराम तू | या विश्वाचा ||४||
श्वास माझा तू रे | विश्वास एक तू ||
अद्वैत स्वामी तू | या दासाचा ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


कारुण्यरूपिणीं दुर्गे वन्दे तारुण्यरूपिणीम् |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
९५ || हे दुर्गे तुला कारुण्यरूपिणीला आणि तारुण्यरूपिणीला मी वंदन करतो. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ब्रह्मविद्या अरु योग का, आदि गुरु है कौन । ऋषि मुनि योगी शिष्य हैं, कहौ पुरुष यह कौन ।।२४।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय) ०१/०९/२४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्या आणि अनुभव योग तत्त्व सांगणारा आदि गुरु कोण आहे ? ज्याचे शिष्य ऋषि-मुनी आणि योगी आहेत, असा पुरुष कोण आहे ? सांगावे.
ब्रह्मविद्या योग मार्गाचे आदि गुरु कोण आहेत ? हाच प्रश्न या दोह्यात केला आहे. या प्रश्नाचे समाधान तत्त्वदर्शी विद्वानांनी करावे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## साईबाबा

आधुनिक केसरी

साईबाबा (१८५६ – १५ ऑक्टोबर, १९१८) एक भारतीय अवलिया



फकीर होते. अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील शिर्डी ह्या गांवात त्यांचे वास्तव्य असल्यामुळे त्यांना 'शिर्डीचे साईबाबा' म्हणूनही ओळखले जाते. येथूनच बाबांनी सर्वांना श्रद्धा व सबुरी हा महामंत्र दिला. शिर्डीस आल्यावर प्राप्त होणारी मनःशांती व मिळणारा आत्मविश्वास यामुळे शिर्डी हे भारतासह जगभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे.श्री साईसच्चरित ग्रंथातील अध्याय ४ अनुसार श्री साईबाबांचा जन्म, त्यांचे मातापिता, त्यांचा धर्म, जात आणि पंथ याबाबत कोणतीच माहिती अधिकृतपणे मिळू शकत नाही. भक्तांसाठी श्री साईबाबा एका तरुणाच्या रुपात शिरडीला निंबाखाली प्रकट झाले. श्री साईबाबा शिर्डीमध्ये एका पडीक मशिदीत राहत, जिला ते "द्वारकामाई" असे संबोधित. ते नित्य पांढऱ्या रंगाची मांजरपाटाची कफनी परिधान करत असत. ते डोक्यालाही पांढरे फडके बांधायचे. अनेक वर्षे तरटाचा तुकडा हेच त्यांचे आसन होते. साईबाबा आपला डावा हात लाकडी कठड्यावर ठेवून दक्षिणेकडे तोंड करून धुनीजवळ बसत. हळूहळू त्यांची महती लोकांच्या लक्षात आली. त्यांची कीर्ती सर्वदूर पसरून त्यांच्या अवतार कार्याच्या उत्तरार्धात त्यांनी हजारो लोकांना शिरडीकडे आकर्षित केले. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दशकात सर्व पुजासाहित्यानिशी समारंभपूर्वक त्यांची पूजा सुरू झाली, आणि द्वारकामाईला राजदरबाराचे स्वरूप प्राप्त झाले. तरी देखील बाबांनी आपली साधी जीवनशैली बदलली नाही. भक्तांना त्यांचे ईश्वरी प्रेम आणि वरदान प्रत्यक्ष प्राप्त होत असे. बाबा भक्तांना आपला ईश्वर आाराधनेचा मार्ग बदलू देत नसत. साई या शब्दाचा अर्थ 'मालक' असा आहे. साईबाबांसाठी हिंदू - मुस्लिमांच्यासह सर्व लोक समान होते. त्यांनी धर्मनिरपेक्षतेची शिकवण दिली. “अल्ला मालिक" "श्रद्धा सबुरी" हे साईंचे बोल होते.


१५ ऑक्टोबर १९१८ रोजी दसऱ्याच्या दिवशी श्री साईबाबांनी शिर्डीत महासमाधी घेतली.[२] बाबांच्या कृपेने आजही भक्तांना अनुभव येतो. त्यामुळे बाबांप्रती भक्तांची निष्ठा व सबुरी निर्माण होते. बाबांचे दरबारी आलेल्या भक्ताच्या सर्व व्यवहारी अपेक्षा, मनोकामना बाबांपर्यंत निश्चित पोहोचतात व ते त्या पूर्ण करतात. कोणीही बाबांचे दरबारातून रिकाम्या हाताने परत जात नाही अशी सर्व सामान्य भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

## साक्षित्वाने राहणाऱ्याला दु:खाची बाधा नाही

आधुनिक केसरी

देहबुद्धी आहे तोवर, म्हणजे 'मी देही आहे' ही भावना आहे तोपर्यंत, काळजी राहणारच. काळजी मनातून असते. जोवर संशय फिटत नाही, परमेश्वराचा आधार वाटत नाही, तोवर काळजीही मनाला सोडीत नाही.

कुंडलीतल्या ग्रहांच्या अधिकाराची मर्यादा देहापर्यंतच आहे. पैसा किती मिळेल हे त्यावरून सांगता येईल, भगवंताकडे किती कल आहे हे सांगता येईल, पण भगवंताची प्राप्ती होईल की नाही हे सांगता येणार नाही. मनुष्यजन्म येऊनही भगवंताची प्राप्ती नाही झाली, तर जिवाचे फार नुकसान आहे. भगवंताच्या प्राप्तीची मनापासून तळमळ लागायला पाहिजे. एकदा का अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो, आणि कोणी संत भेटला की निवांत होतो. संत आपल्यावर येणारी संकटे नाहीशी करीत नाहीत, तर त्या संकटांची भिती नाहीशी करतात. संकटापेक्षा संकटाची भितीच आपल्याला फार घाबरवून सोडते. 'आपल्याला हे कळले ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या,' असा संतांचा



एकच हेतू असतो. संत विषयावर मालकी गाजवितात. जगाला जिंकणे एक वेळ सोपे, पण स्वतःला जिंकणे कठीण आहे. संत स्वतःला जिंकून जगात वावरत असतात. संत साक्षित्वाने जगात राहतात, आणि साक्षित्वाने राहणाऱ्याला दुःखाची बाधा होत नाही. संतांच्या संगतीत राहून, त्यांच्या आज्ञेत राहून, आपण आपल्या मनातले सर्व संशय नाहीसे करावेत.

वास्तविक, संतांच्या आज्ञेचे एकनिष्ठपणाने जो पालन करतो, त्याचे संशय आपोआप दूर होतात. जोवर संशय आहे तोवर असमाधान आहे. समाधान हे आपले आपल्यालाच घ्यायचे असते. म्हणून ज्याला समाधानी राहायचे आहे, त्याने फार धडपड करू नये. जशी स्थिती येईल त्या स्थितीत समाधानात राहावे. कचेरीचे विचार आपल्याबरोबर घरी आणू नयेत; ते तिथेच ठेवावेत. घरातले वातावरण शुद्ध आणि निःसंशयाचे असावे. भोळेपण एकप्रकारे चांगले;

ती भाग्याची गोष्ट आहे. जो योगभ्रष्ट असतो त्याच्या अंगी भोळेपण असते; जसे कल्याणस्वामींच्या अंगी होते. झालेल्या गोष्टी विसरून जाण्यातच आनंद आहे; पण ते विसरणे कृत्रिमपणे न आणता, भगवंताच्या स्मरणात राहिल्याने आले पाहिजे. म्हातारपणी मन आणि शरीर फार नाजूक बनते. त्या वेळी शरीरसुद्धा बरे राहायला, आनंद हे फार मोठे औषध आहे. हसावे, खेळावे, लहान मुलांत मिसळावे, थट्टा-विनोद करावा; काहीही करावे पण आनंदात राहावे. ज्याचा आनंद कायम टिकला, त्याच्याच जन्माचे सार्थक झाले.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, २५ सप्टेंबर २०२३

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 24 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-53 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5


# विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर : डॉ. बाळासाहेब पवार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये महाविद्यालय मुख्य भूमिका बजावत असून व्यक्ती आणि समाजाच्या विकासात महाविद्यालयांचा वाटा मोलाचा आहे. नवनवीन प्रयोग, प्रात्यक्षिके, अभिनव कल्पनांच्या माध्यमातून महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांचे जीवन घडवित असतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, ज्ञानरचनावाद पध्दतीचा वापर करुन आनंददायी, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर आमचा भर राहील, असे प्रतिपादन शिवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांनी रविवारी येथे केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी शिवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार बोलत होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना डॉ. बाळासाहेब पवार म्हणाले की, शिक्षकांनी मुलांमध्ये समाजाच्या मुख्य प्रवाहात टिकण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करावा. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहनही डॉ. बाळासाहेब पवार यांनी केले. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.



छायाचित्र : सचिन उबाळे



# हंसराज अहीरांनी बांधावर जाऊन केली रोगाने उद्ध्वस्त सोयाबिनची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वरोरा तालुक्यातील शेकडो गावातील शेतकऱ्यांचे सोयाबिन पिक करपासारख्या अज्ञात रोगाने शंभर टक्के उध्दवस्त झाल्याने शेतकऱ्यांचे हितैषी, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दि. 22 रोजी दिल्लीहून चंद्रपूरास परततांना खांबाडा या गावास भेट देवून उध्दवस्त झालेल्या सोयाबिन पिकाची शेतावर जावून पाहणी केली. शेतकऱ्यांनी नुकसानीबाबत तक्रारी करूनही तालुका प्रशासनाचे अधिकारी व अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी केली नसल्याने प्रशासनाच्या भुमिकेवर रोष व्यक्त करीत या नुकसानीचा त्वरीत सर्व्हे करून नुकसानीचा अहवाल शासनाकडे मदतीकरीता सादर करण्याचे निर्देश दिले.
यावेळी हंसराज अहीर यांनी खांबाडा येथील नामदेवराव धोटे व महादेव चाफले यांच्या शेतीवर जावून पिकांची पाहणी केल्यानंतर पिडीत शेतकऱ्यांनी करपासदृष्य रोगामुळे खांबाडासह वाटोळा, कोसरसार, बारव्हा, पट्टापूर, बोपापूर, रामपूर, वडगांव आदी गांवातील मागासवर्गीय, दलित, आदिवासी शेतकऱ्यांचे संपुर्ण सोयाबिन रोगाने उध्दवस्त झाल्याची माहिती दिली.
सन 2008 मध्ये लष्करी अळीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. यंदा करपा सदृष्य अन्य रोगामुळे सोयाबिन संपूर्ण उध्दवस्त झाल्याने 2008 ची पुनरावृत्ती झाली असून हा रोग जिल्हाभर सर्वत्र पसरण्याची स्थिती निर्माण झाली असल्याच्या तक्रारी येत असून या संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचा हात देण्याची गरज असल्याने जिल्हा प्रशासनाने या संकटाची गंभीरपणे दखल घेवून तातडीने नुकसानीचे सर्वेक्षण व नोंदणी घेण्याचे सुचनावजा आदेश हंसराज अहीर यांनी पत्राद्वारे दिले आहेत.
खांबाडा शिवारात नुकसानीची पाहणी करतांना हंसराज अहीर यांच्या समवेत भाजप पदाधिकारी माजी जि.प. सदस्य राजु गायकवाड, वसंता बावने, संतोष उरकुडे, अशोक ताजने, इन्द्रपाल ताजने, डॉ. मोरेश्वर राऊत व गांवातील पिडीत शेतकरी बांधव उपस्थित होते.

# वाशिम येथील जैन भवनात आज राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक

## जेष्ठ नेते अनिल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** येथील जैन भवनात आज दि.२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडत असलेल्या सदर कार्यक्रमात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते तथा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती राहणार आहे. या निमित्ताने आज नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सुद्धा करण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रम नियोजित वेळेवर होणार असून, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व शरदचंद्र पवार साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) गटाच्या वतीने करण्यात आले आहे.

सदर आढावा बैठकीत राज्याचे माजी गृहमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. शरदचंद्र पवार यांच्या विचारधारेवर प्रेम करणारे जिल्ह्यातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. येणाऱ्या काळात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. पक्षाला प्रेरित असलेली फुले, शाहू,आंबेडकरांची विचारधारा समाजातील दलित, आदिवासी, वंचित, महिला व जास्तीतजास्त युवकापर्यंत पोहोचविण्यासाठी यावेळी एक साचेबंद कार्यक्रम आखण्यात येणार आहे. तसेच उपरोक्त सर्व घटकांच्या उत्थानासाठी पक्षाच्यावतीने समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे. अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली आहे. दरम्यान नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात येणार आहेत. या बैठकीला पक्षनिरीक्षक प्रा. विश्वनाथ कांबळे, जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग ठाकरे, ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, प्राचार्य अरुणराव सरनाईक, माजी सभापती डॉ.भगवानराव गोटे, माजी जिल्हाध्यक्ष सुनील पाटील दहात्रे, महिला जिल्हाध्यक्ष वैशालीताई मेश्राम, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनंत काळे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश चंदनशिव, सामाजिक न्याय विभागाच्या महिला जिल्हाध्यक्ष किरण इंगोले, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर आढावा बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तसेच शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्यांनी मोठ्या संख्येने वाशिम येथील जैन भवनात वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी केले आहे.

# अंत्यदर्शनासाठी तुडूंब भरलेल्या नाल्यातून गावकऱ्यांचा जीवघेणा प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली:** महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील व गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील भामरागड तालुक्यात आजही पूल, रस्त्यांसह इतर मूलभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे येथील नागरिकांना पावसाळ्यात जीव धोक्यात टाकून प्रवास करावा लागत आहे.
नुकतेच लाहेरी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या कोयर गावातील साहिबी पुंगाटी यांचे निधन झाले.
लाहेरी परिसरातील नागरिकांना अंत्यदर्शनासाठी लाहेरी ते कोयरदरम्यान असलेल्या तुडुंब भरलेल्या नाल्यातून दोरीच्या सहाय्याने जीव धोक्यात घालून हा नाला पार करावा लागला.
छत्तीसगड सीमेवर असलेल्या भामरागड तालुक्यातील लाहेरी हे शेवटचा ग्रामपंचायत याच ग्रामपंचायत अंतर्गत समाविष्ठ कोयर या गावात साहिबी पुंगाटी यांचे निधन झाले.याची माहिती मिळताच लाहेरी परिसरातील नागरिकांना (नातेवाईक) २१ सप्टेंबर रोजी कोयर ला अंत्यदर्शनासाठी जायचे होते.मात्र, मागील काही दिवसापासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने या भागातील नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत.अश्या परिस्थितीत या भागातील महिला-पुरुषांनी एकत्र येत नाल्याच्या दोन्ही बाजूला झाडाला दोरी बांधून स्वतःचा जीव धोक्यात टाकून कोयर गाव गाठले अन अंत्यदर्शन घेतले.
या संघर्षाचे काही चलचित्र मोठ्या प्रमाणात समाजमाध्यमात व्हायरल होत असून नागरिकांकडून संताप व्यक्त केले जात आहे.
जिल्ह्याच्या आदिवासीबहुल अतिदुर्ग भागाच्या विकासासाठी राज्य केंद्र शासनाकडून मोठा निधी खर्ची घातला जातो. या माध्यमातून आजमितीस हा परिसर विकासाच्या प्रवाहात येत असला तरी येथे रस्ते, पूल व वाहतुकीच्या साधनांचा प्रचंड अभाव आहे.त्यामुळे या भागाचा विकासाला खीळ बसली आहे.
लाहेरी पलीकडे जवळपास १० ते १२ गावांचा समावेश आहे.या भागात अजूनही मुख्य रस्ते,नदी-नाल्यावर पूल नसल्याने या भागातील नागरिकांना पावसाळ्यात मोठा संघर्ष करावा लागत आहे.पावसाळ्यात रुग्णनांना देखील खाटेवर,झोळीत किंव्हा,खांद्यावर घेऊ। यावे लागते.
ही परिस्थिती केवळ या भागातील नागरिकांचीच नाही तर लगतच्या छत्तीसगड राज्यातील रुग्णांना देखील याच परिस्थितीचा सामना करावा लागतो. भागात मोठे रुग्णालय नसल्याने लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्राशिवाय दुसरे पर्याय नाही.मात्र,लाहेरी गाठण्यासाठी पावसाळ्यात जीव धोक्यात टाकून जल प्रवास करावा लागतो.२१ सप्टेंबर रोजी अंत्यदर्शन घेण्यासाठी गेलेल्या नागरिकांना याच परिस्थितीचा सामना करावा लागला.त्यात पुरुषांसोबत महिलांचाही समावेश होता.तर अंत्यदर्शनासाठी लागणारा सामान सुद्धा याच परिस्थितीत घेऊन जावं लागला.

# राज्यात अतिमुसळधार पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात ऐन गणेशोत्सवात मान्सून सक्रिय झाल्या आहे. सिक्कीम ते मध्य महाराष्ट्र या भागामध्ये कमी दाबाचा पट्टा तीव्र झाल्यामुळे राज्यात गेल्या २४ तासात बहुतांश भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. दरम्यान, येत्या बुधवारपर्यंत संपूर्ण राज्यामध्ये हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे.
त्यामुळे आज रविवार असून नागरिकांनी दिवसभरात घराबाहेर पडताना हवामानाचा अंदाज घ्यावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
राज्यात आज अनेक जिल्ह्यांना येलो अलर्ट असून विदर्भात पावसाचा जोर जास्त असणार असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. यामुळे पुढच्या २४ तासांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल. तर २७ सप्टेंबरपर्यंत फक्त विदर्भात पावसाचा जोर असेल, अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.



वामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, अमरावती, अकोला, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड तर मध्य महाराष्ट्रात पुणे, सातारा, सोलापूर, उत्तर महाराष्ट्र, नाशिक, जळगाव, कोकण, रत्नागिरी, रायगड, ठाणे, या जिल्ह्यांना २७ सप्टेंबरपर्यंत येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.
पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरामध्ये शुक्रवारपासूनच पावसाचा जोर वाढल्याचे पाहायला मिळते. अशात आजही पुण्यामध्ये पावसाची संततधार सुरूच आहे तर कोकण मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात पुढच्या ३-४ तासांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना हवामानाचा अंदाज घ्यावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## खरगेंची ग्वाही

आधुनिक केसरी

आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस केंद्रात सत्तेवर आल्यास महिला आरक्षण विधेयकात सुधारणा करेल,' अशी ग्वाही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी दिली. ते म्हणाले, की या विधेयकाच्या तत्काळ अंमलबजावणीत कोणतीही मोठी कायदेशीर गुंतागुंत नसताना मोदी सरकार मात्र या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी आगामी दहा वर्षे प्रतीक्षा करायला लावणार आहे. जयपूरमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यास संबोधित करताना खरगे बोलत होते. ते म्हणाले, की संसदेत या विधेयकाला पाठिंबा देताना काँग्रेसने ते तत्काळ लागू करण्याची मागणी केली होती. तसेच त्यात इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी वेगळे आरक्षण असावे, अशी काँग्रेसची मागणी आहे. केंद्रात २०२४ मध्ये आमचे सरकार जेव्हा येईल, तेव्हा आम्ही सर्वप्रथम या विधेयकात तशी सुधारणा करू. केंद्र सरकारने अनुसूचित जाती-जमातींना काय महत्त्व दिले? संसदेच्या नवीन इमारतीच्या पायाभरणीसाठी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना ते दलित असल्याने निमंत्रित करण्यात आले नव्हते, असा आरोपही खरगे यांनी यावेळी केला. मी अनुसूचित जाती-जमाती आणि मागासवर्गीयांना हा प्रश्न विचारतो, ही काही त्यांना काही प्रतिष्ठा दिली जाते का? लोकसभा अधिवेशन पंतप्रधान नव्हे तर राष्ट्रपती बोलावतात. पण राष्ट्रपतींनाच येथे आदराचे स्थान नाही. आम्ही महिलांचा खूप आदर करतो, असा मोदींचा दावा कशाच्या आधारे आहे? संसदेच्या नवीन इमारतीच्या पायाभरणीसाठी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना ते दलित असल्याने निमंत्रित करण्यात आले नव्हते, असा आरोपही खरगे यांनी यावेळी केला. संसदेच्या नवीन वास्तूच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते, कलाकारांसह इतर अनेकांना आमंत्रित करण्यात आले होते पण राष्ट्रपतींना आमंत्रण नव्हते. हा त्याचां अपमान आहे. महिला आरक्षण विधेयक आणण्यामागील नरेंद्र मोदी सरकारच्या हेतूबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करून खरगे म्हणाले, की भाजपला खरे तर महिलांना आरक्षण द्यायचेच नाही. भाजपने निवडणुकीपूर्वी महिला आरक्षण विधेयक आणले. कारण अनेक विरोधी पक्षांनी मिळून 'इंडिया' आघाडी स्थापन केली आहे. जेव्हा राहुल गांधी, सोनिया गांधी आणि आम्ही मिळून विरोधी पक्षांची आघाडी 'इंडिया'ची स्थापना केली तेव्हा भाजपच्या मनात महिला विधेयक आले. सरोजिनी नायडू या काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या असे सांगून खरगे यांनी विचारले, की राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा भाजपची कोणतीही महिला अध्यक्ष झाली आहे का? संघाच्या उच्च पदापर्यंत कोणतीही महिला पोहोचली आहे का? काँग्रेस हाच महिलांचा खरा आदर करणारा पक्ष आहे. काँग्रेसच्या काळात पहिल्या महिला राज्यपाल सरोजिनी नायडू होत्या, विजयालक्ष्मी पंडित संयुक्त राष्ट्रांत होत्या, मीरा कुमार लोकसभेच्या अध्यक्ष होत्या, पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या, पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभा पाटील होत्या, याकडे खरगेंनी लक्ष वेधले.

## बहुजनाच्या बाळा, आता कोठे शिकशी शाळा ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मग शासनातर्फे पाच हजार शाळा बंद करण्यात येवून बहूजन समाजाला शिक्षणापासून दूर सारून मुलभूत अधिकाराचे हनन होत आहे; तरी असेकसे कोणालाही काहीच का वाटू नये? नवलच म्हणावे, नाही का? कलम क्रमांक २१ (अ) नुसार मुलाच्या शिक्षणाला एकही रुपया खर्च लागत नाही, चौदा वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार असला तरी शासकीय शाळा बंद करून खाजगी शाळेला तो नियम लागु नाही. खाजगी शाळा चौदा वर्षे वय होईपर्यंत त्याच्या आईवडीलांची, आजीआजोबांची असलेली सर्व कमाई शिक्षणाच्या नावाखाली लुटून घेतात की जे शिक्षण मोफत असते. ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांचे काय? आणि शिक्षण मुलभूत अधिकार असताना विकत का घ्यावे? हजारो वर्षापासून शिक्षणापासून दूर ठेवले होते. शिक्षणाने प्रगती होते, हे बघून पुन्हा शिक्षणापासून दूर नेण्याचा हा प्रयत्न आहे.**

सरकारी आकडेवारी नुसार ८० टक्केपेक्षा जास्त लोकांचा महिन्याचा पगार दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. ज्याचा पगार हजारात आहे, तो लाखोची फी कशी काय भरणार? लॉकडाऊनमुळे देशात अशी परिस्थिती निर्माण झाली की हजारो किलोमीटर पायी चालणाऱ्या लहान मुलाच्या पायात चप्पल नाही, घरात खायला अन्न नाही अशी परिस्थिती असलेल्या लोकांचीही संख्या कमी नाही. सरकारी शाळा बंद केल्यानंतर पायात चप्पल नसलेल्या, अंगात कपडे नसलेल्या आणि पोटात अन्न नसलेल्या मुलांना खाजगी शाळेत प्रवेश कसे मिळणार? निर्दयी सरकार संविधानाने दिलेले सर्व हक्क अधिकार, ही व्यवस्था काढून घेत आहे आणि आपण आहे तेवढ्यातच सुख मानून जीवन जगत आहोत. शाळा बंद करून शिक्षण, नोकरी बंद करून आरक्षण आणि बेरोजगार करून आर्थिक कमाई बंद केली आहे. वरिल सर्व संविधानाने दिलेले असताना सर्व हिरावून घेतले जात आहे आणि आम्ही मात्र गप्प बसलो आहोत. कारण मानसिक गुलामीच्या बेडीतून बाहेर येऊन संविधान वाचलेच नाही. बहुजन लोकांनी संविधान वाचले नाही म्हणून म्हणावेसे वाटते, "बहूजनाच्या मुला रे, शाळा शिकतो कशाला रे?

राज्यसरकारने जवळ जवळ पाच हजार सरकारी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने सरकारचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. शाळा बंद करण्याचा निर्णय हा अचानक घेतला गेला नाही हेही तेवढेच खरे आहे. बहुजन समाजातील लोक शिकले, शिकल्यामुळे वाचणे शक्य झाले, परंतु मेंदुचा योग्य वापर आणि स्वतः तर्क करत नसल्याने देश मातीत चालला, तरी शिकलेल्या वर्गाला जाणीव राहली नाही. ज्यांना जाणीव आहे त्यांना प्रसिद्धी दिली जात नाही, म्हणून सत्य समाजापर्यंत पोहचत नाही. आज अनेक निर्णय घेऊन सरकार लोकहिताच्या विरोधात काम करताना दिसत आहे. ज्यांना विध्वंसक सवर्ण व्यवस्थेचा अभ्यास आहे, त्यांना ह्या गोष्टीत नवल असे काही नाही. परंतु निर्णय मात्र घातकच आहेत. याची जाणीव लोकांना होत नाही, ही जिवंत माणसाची लक्षणे नाहीत. जिवंत माणसाला भावना, संवेदना असतात. सरकारच्या आडमुठ्या चुकिच्या ध्येय धोरणांविरोधात जर माणूस संवेदनशील होत नसेल, भावनिक होत नसेल तर तो माणूस संपलेला आहे! असे गृहीत धरून जागृत लोकांनी एकतेने लढा देणे आवश्यक आहे. जवळजवळ पाच हजार सरकारी शाळा बंद करण्याची वेळ का आली? हे सगळे एकाच दिवशी का घडले? शाळेवर शिकवणाऱ्या शिक्षकाला खरच याची जाणीव व गांभीर्य आहे का? असे अनेक प्रश्न डोक्यात येतात. शाळा बंद करण्यामागे सुद्धा तीच व्यवस्था आहे. ही व्यवस्था जोपर्यंत लक्षात येणार नाही, तोपर्यंत आपण आपल्या येणाऱ्या पिढीला आदर्श जीवन जगू देऊच शकणार नाही. शाळा बंद करण्यामागे व्यवस्था आहे हे वाचून अनेकांना नवल वाटेल, पण शिक्षण अर्थात शाळा बंद करण्यामागे ही भूताटकी व्यवस्था कारणीभूत कशी? हे आपण समजून घेणे महत्त्वाचे आहे. संविधानाच्या अगोदर बहुजन समाजाला शिक्षण, संपत्ती, स्वातंत्र्य, नोकरी, न्याय, समानता, सत्ता, या गोष्टी मिळवण्याचा अधिकार नव्हता. माणूस म्हणून जन्माला यायचे व पशू बनून जगायचे आणि लाचार होऊन मरायचे. हीच ती विघ्नसंतोषी व्यवस्था होती. अशी मानवी जीवनाला कलंक लालणारी माणसाला माणसाचा दर्जा न देणारी घाण समाजामध्ये याच गलिच्छ व्यवस्थेने केली होती. ही व्यवस्था उलथून टाकण्यासाठी बुद्धांपासून तर अलिकडे संतशिरोमणी गाडगेबाबा, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पर्यंतच्या थोर विभूतिंनी या मुर्दाळ व्यवस्थेवर वार करण्याचे काम केले. परंतु त्या व्यवस्थेने हजारो वर्षापासून माणसाला मानसिक गुलाम बनवले आहे, म्हणून माणसामध्ये परिवर्तन ही आव्हानात्मक बाब आहे.

आधुनिक भारतामध्ये सुद्धा बहुजनांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तो अधिकार महात्मा फुले, सावित्रीमाई फुले आणि फातिमाई शेख यांनी अंगावर दगडमाती घेऊन आम्हाला मिळवून दिला, छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षण, आरक्षण आणि संरक्षण बहुजन समाजाला मोफत दिले. संविधानामुळे आम्ही शिकलो. खाजगीकरणामध्ये पहिले कशाचे खाजगी करण केले असेल तर ते शाळेचे. खाजगी शाळा सुरु करून शिक्षणाचा काळा बाजार देशात मांडला, स्वतःला विद्वान समजणाऱ्या स्वयंघोषित विद्वानांनी खाऊजाचे फायदे आणि तोटे यावर कधीच चर्चा केली नाही. पहिली पायरी शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा बाजार शासकीय पैशाने मांडला व सरकारी पैशाने खाजगी शाळांना जगवण्याचे काम सरकारणे स्वतः केले व सरकारी शाळेकडे दुर्लक्ष केले. सरकरी नोकरी बंद करून शिक्षणाचे महत्त्व लोकांच्या मनातून कमी केले. शिकलेला तरुण बेरोजगार फिरताना बघून लोकांनी शिक्षणाला दोष द्यायला सुरवात केली. शिकला पण नोकरी नाही, तर शिक्षण काय कामाचे अशी अवस्था या व्यवस्थेने करून ठेवली. परिक्षा न घेता सरसकट पास करण्याच्या निर्णय घेऊन मुलांना अभ्यास करणाचा ताण सरकारने कमी केला, अभ्यास नाही म्हणजे ज्ञान नाही, तर्क नाही, लिखाण वाचन नाही, परिक्षाच नाही म्हणजे शाळेत गेले नाही तरी चालते अशी मानसिकता लोकांची बनवली, हळु हळू शाळेतील सरकारी शाळेत परिक्षा नाही म्हणून थोडेफार पैसे असणाऱ्या लोकांचा कल खाजगी शाळेकडे वळाला, परिक्षा नाही म्हणून विद्यार्थ्यांचे उपस्थिती प्रमाण घटले आणि हेच सरकारला अपेक्षित होते. सरकारी शाळेत विद्यार्थी येत नाही हे कारण सांगुन शाळा बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. परंतु सरकारी शाळेत विद्यार्थी का येत नाही याचे स्पष्टीकरण सरकारने दिले नाही. खाजगी शाळेचे गोंडस स्वप्न दाखवून शिक्षणाचा बाजार मांडलेल्या देशात सरकारी शिक्षकांना पगार जास्त पण सरकारी शाळेची उपस्थिती व गुणवत्ता कमी, या उलट खाजगी शाळेत शिक्षकांना नाममात्र पगार तेथे गुणवत्ता व उपस्थिती जास्त असते. विद्यार्थ्यांना शाळेत टाकल्यावर अभ्यास नाही, चाचणी नाही, परिक्षा नाही, तर विद्यार्थांचा बौद्धिक विकास कसा होणार? उलटपक्षी खाजगी शाळेत साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, सहा माही व वार्षिक परिक्षा होतात; म्हणून तेथे आज थोडीफार पुस्तकी गुणवत्ता दिसते. परिक्षा न घेण्याचे कारण सरकारने सांगितले होते, की अभ्यासाच्या ताणामुळे विद्यार्थी आत्महत्या वाढल्या आहेत. म्हणून परिक्षा बंद केल्या. परंतु माझ्यासह सर्वांच्या परिसरामध्ये सरकारी शाळेतील एकाही विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या ताणामुळे आत्महत्या केली. असे उदाहरण दिसत नाही, पण सरकारने तसे वातावरण निर्माण केले आणि परिक्षा न घेण्याचा निर्णय घेतला. परिक्षाच नाही म्हणून शाळेकडील ओढा हळूहळू कमी झाला आणि आज सरकारने तब्बल पाच हजार सरकारी शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊन गोरगरीब बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर ठेवण्याचे षडयंत्र रचले आहे. सरकारी शाळा बंद झाल्या. आता जर मुलांना शिकवायचे असेल तर हजारो, लाखो रुपये भरून खाजगी शाळेत शिकवावे लागणार, कारण खाजगीशाळा सुरू राहणार आहेत. कलम क्रमांक २१ (अ) नुसार मुलाच्या शिक्षणाला एकही रुपया खर्च लागत नाही, चौदा वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार असला तरी शासकीय शाळा बंद करून खाजगी शाळेला तो नियम लागु नाही. खाजगी शाळा चौदा वर्षे वय होईपर्यंत त्याच्या आईवडीलांची, आजी आजोबांची असलेली सर्व कमाई शिक्षणाच्या नावाखाली लुटून घेतात की जे शिक्षण मोफत असते. ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांचे काय? आणि शिक्षण मुलभूत अधिकार असताना विकत का घ्यावे? हजारो वर्षापासून शिक्षणापासून दूर ठेवले होते. शिक्षणाने प्रगती होते, हे बघून पुन्हा शिक्षणापासून दूर नेण्याचा हा प्रयत्न आहे. सरकारी आकडेवारी नुसार ८० टक्केपेक्षा जास्त लोकांचा महिन्याचा पगार दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. ज्याचा पगार हजारात आहे, तो लाखोची फी कशी काय भरणार? लॉकडाऊनमुळे देशात अशी परिस्थिती निर्माण झाली की हजारो किलोमीटर पायी चालणाऱ्या लहान मुलाच्या पायात चप्पल नाही, घरात खायला अन्न नाही अशी परिस्थिती असलेल्या लोकांचीही संख्या कमी नाही. सरकारी शाळा बंद केल्यानंतर पायात चप्पल नसलेल्या, अंगात कपडे नसलेल्या आणि पोटात अन्न नसलेल्या मुलांना खाजगी शाळेत प्रवेश कसे मिळणार? निर्दयी सरकार संविधानाने दिलेले सर्व हक्क अधिकार, ही व्यवस्था काढून घेत आहे आणि आपण आहे तेवढ्यातच सुख मानून जीवन जगत आहोत. शाळा बंद करून शिक्षण, नोकरी बंद करून आरक्षण आणि बेरोजगार करून आर्थिक कमाई बंद केली आहे. वरिल सर्व संविधानाने दिलेले असताना सर्व हिरावून घेतले जात आहे आणि आम्ही मात्र गप्प बसलो आहोत. कारण मानसिक गुलामीच्या बेडीतून बाहेर येऊन संविधान वाचलेच नाही. बहुजन लोकांनी संविधान वाचले नाही म्हणून म्हणावेसे वाटते, "बहुजनाच्या मुला रे, शाळा शिकतो कशाला रे?"

## भारत - कॅनडा तणावाला कॅनडाच जबाबदार




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**कॅनडा आणि भारताचे संबंध कमालीचे तणावग्रस्त बनले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी खलिस्तान फुटीरतावादी नेते हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा आरोप करून भारताच्या एका वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्याची हकालपट्टी केली. वास्तविक हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा कोणताही हात नाही असे भारतीय परराष्ट्र खात्याने सांगूनही त्यांनी ही कारवाई केली. कॅनडाच्या या कारवाई नंतर भारतानेही कॅनडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी केली व कॅनडामध्ये जाणाऱ्या प्रवाशांचा व्हिसा तहकूब केला.**

या घटनेनंतर दोन्ही देशातील तणाव कमालीचा वाढला आहे आणि याला सर्वस्वी कॅनडाच जबाबदार आहे. खलिस्तान या फुटीरतावादी संघटनेवर भारताने बंदी घातली आहे मात्र कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. याच संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवून आणली आहे. भारतापासून अलग होऊन स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. १९८० च्या दशकात ही संघटना खूप आक्रमक होती. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे म्हणून भारताने तिच्यावर बंदी घातली मात्र आजही या फुटीरतावादी संघटनेचे काम चालूच आहे. या संघटनेला परदेशातून विशेषतः कॅनडा या देशातून आर्थिक आणि सामरिक मदत मिळते. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा पासूनच कॅनडामधून त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती. आज ४० वर्षानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक





मंत्र्यांचा समावेश आहे. अमृतपाल सिंग या खलिस्तानी अतिरेक्याला भारताने अटक केल्यावर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडा मध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रुडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रुडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले. ट्रुडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध केला मात्र भारताच्या निषेधाकडे ट्रूडो यांनी दुर्लक्ष करत खलिस्तानला समर्थन देणे चालूच ठेवले. ट्रुडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घेऊन कॅनडाला खडसावले. त्यामुळेच जस्टीन ट्रूडो यांनी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे भांडवल करून भारताशी पंगा घेतला आहे. अर्थात कॅनडा हे एकट्याच्या जोरावर करत नाही हे उघड आहे कॅनडाला काही देशांचा छुपा पाठिंबा आहे. भारत कॅनडात तणाव निर्माण झाल्यावर पाकिस्तानने कॅनडाची बाजू घेत भारतावर टीका केली. पाकिस्तान हे करणारच होता त्यात काही विशेष नाही मात्र भारताचा मित्र देश असलेल्या ऑस्ट्रेलियाने देखील यात कॅनडाची बाजू घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ऑस्ट्रेलियन परराष्ट्र खात्याने भारताने या हत्येच्या तपासात कॅनडास सहकार्य करावे असे म्हंटले आहे वास्तविक या हत्येमागे भारताचा हात नाही असे भारताने स्पष्ट केले असतानाही या देशाने अशी भूमिका का घेतली हे एक कोडे आहे. वास्तविक खलिस्तान ही फुटीरतावादी संघटना आहे ती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देते आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारे किंवा फुटीरतावाद्यांना पाठबळ देणारे आमचे मित्र होऊ शकत नाही असे भारताने कॅनडाला ठणकावून सांगायला हवे. जोवर कॅनडा फुटीरतावाद्याना समर्थन आणि पाठबळ देणे थांबवत नाही तोवर दोन्ही देशातील संबंध पूर्ववत होणार नाही अशी भारताने ठोस भूमिका भारताने घ्यायला हवी इतकेच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील हा मुद्दा उचलून धरायला हवा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ओबीसी आंदोलनकर्ते आक्रमक; चक्का जामनंतर आज प्रेतयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ओबीसी विद्यार्थी संघाचे रविंद्र टोंगे यांची प्रकृती खालावल्यानंतर त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या ओबीसी महासंघाच्या बैठकीत आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्या अनुषंगानेच नागपुर महामार्गावर स्थानीय जनता कॉलेज चौकामधे चक्का जाम आंदोलन करण्यात येत आले.
आज दि. 29 सप्टेंबर ला राष्ट्रीय ओबीसी महासंघाने प्रेतयात्रा काढत आपला असंतोष शासन दरबारी मांडण्याचा प्रयत्न केला. उपोषण मंडपापासून या प्रेतयात्रेला सुरुवात करण्यात आली व स्थानिक बस स्थानक चौकातच पोलीसांनी ही प्रेतयात्रा अडवली. त्यामुळे आंदोलनात सहभागी समाज अधिक आक्रमक झाला होता. पोलीसांनी ही परिस्थिती अतिशय संयमाने हाताळत आंदोलनकर्त्यांना गाडीत बसवित परिस्थिती आटोक्यात आणली.

या प्रेतयात्रेत विधान परिषद सदस्य सुधाकर अडबाले, प्राचार्य अनिल शिंदे, नंदू नगरकर, सूर्यकांत खनके यांच्यासह ओबीसी समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.






# मुसळधार पावसामुळे पुन्हा वाहू लागले धबधबे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात दि.२३ रोजी मुसळधार पावसामुळे वेरुळ लेणी येथील धबधबे व ठिकठिकाणी ओढे नाले नदी यांचे पाणी वाहते झाले असल्याचे चित्र सध्या तालुक्यात पहाण्यास मिळत आहे.
पावसाळा संपत आले असताना अद्याप नदी नाले ओढे तलाव कोरडे पडून आहे.असे असताना दि.२३ व दोनतीन दिवसांपुर्वी पासून तालुक्यात उतरा नक्षत्रांचे पाऊस सुरु असुण ठिकठिकाणी नदी नाले ओढ्यांना पुर पाणी वाहते झाले असल्याचे चित्र आहे.तर वेरुळ लेणी येथील धबधबे जोरदार पणे पुन्हा खळखळुन वाहत असल्याचे चित्र आहे.तर तालुक्यात उतरा नक्षत्रांचे पावसामुळे खरिप पिके पुन्हा टवटवीत हिरवीगार झाली आहे. तर आलेल्या उतरा पावसामुळे खरिप पिकांना जीवदान मिळाले आहे.तर ऐन फुलाऱ्या वेळी पाऊस येत असल्याने पिकांची स्थिती चांगली टवटवीत हिरवीगार झाली आहे.

# राजूर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने ठिय्या आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन तात्काळ आरक्षण द्यावे या मागणीसाठी तसेच मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी राजूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण करत ठिय्या आंदोल सुरु करण्यात आले आहे.
मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ राजूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून आंदोलनास सुरुवात झाली. यावेळी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, लाठीचार्ज करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे, आंदोलकांवरील सर्व गुन्हे तत्काळ मागे घ्यावे यासारख्या मागण्या करण्यात आल्या. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहणार असा निर्धार सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी या आंदोलनास भेटी दिल्या. हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांनाही निवेदन देण्यात आले. यावेळी माजी सभापती गजानन नागवे, जगनबाबा पवार, रुद्राणी फाउंडेशनचे अध्यक्ष भीमाशंकर आप्पा दारुवाले, मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, राजुर अर्बनचे अध्यक्ष कैलास आप्पा गबाळे, सचिन सावंत, भगवान ठोंबरे, अनिल पुंगळे, नामदेव पुंगळे, ग्रा.सदस्य निवृत्ती पुंगळे, स्वराज्य संघटनेचे विनोद पुंगळे, शेवाळे सर, आकाश पुंगळे, नितीन पुंगळे, मुकुंद जुंबड, अमोल पवार, दिनेश महाराज शेजुळ,उमेश पुंगळे द्वारकाधीश पुंगळे, मनोज कुमकर, दत्ता घायाळ, अरुण कदम यासह मोठ्या प्रमाणात समाजबांधव उपस्थित होते.



# चक्क पावसाळ्यात झाडाला लागले आंबे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** उन्हाळ्यात लागणारा आंबा चक्क पावसाळ्यात आल्याची घटना चंद्रपुरात उघडकीस आली असून यामुळे सर्वत्र कुतुहल व आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वातावरणातील बदलामुळे उन्हाळ्यात लागणारा आंबा हा पावसाळ्यात लागण्याचे तज्ञाचे म्हणणे आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला आंब्याच्या झाडाला बहर येतो, मग फळ येण्यास सुरूवात होते. मात्र, सिस्टर कॉलनी नगिनाबाग परिसरात अजिंक्य कुशाब कायरकर यांच्या घरी असलेल्या आंब्याच्या झाडाला चक्क पावसाच्या दिवसांमध्ये आंबे लागले आहेत. झाडाला पावसाळ्यात आंबे लागल्यामुळे सर्वत्र कुतुहल व्यक्त होत आहे. आंब्याच्या झाडाला मार्च महिन्यामध्ये मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यानंतर एप्रिल, मे महिन्यात हळूहळू आंबे लागतात. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यात यावर्षी वातावरणात बराच बदल झाला. ऐन उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळला. उन्हाळ्यात पावसाळ्यासारखी स्थिती झाली होती. जून व जुलै हे दोन्ही महिने कोरडे गेले. त्यानंतर पावसाळा सुरू झाला. मध्यंतरी पावसाने अनेक दिवस उघडीप घेतली. त्यामुळे वातावरणात मोठा बदल होवून प्रचंड ऊन, गर्दी व साथींच्या रोगांचे प्रमाण वाढले होते. या वातावरण बदलाचा फरक फळझाडांवरसुद्धा झाल्याचे दिसून येत आहे. वातावरणातील या बदलामुळे सीझन नसताना आंब्याच्या झाडाला आंबे लागल्याचे पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

महाराष्ट्र Business Katta












# लढाई जगण्याची... बाजी नकारात्मकेची



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**आयुष्य फार सुंदर आहे फक्त जगता आलं पाहिजे,पण... शीर्षक पाहून प्रत्येकालाच प्रश्न पडला असेलच की असे कसे काय? पण थोडं चिंतन झालं तर आता पर्यंत घडलेल्या घटनांचं सिंहावलोकन करून पाहिलं तर प्रत्येकाच्या लक्षात येईल की खरंच जीवन जगण्यापेक्षा मरणं सोपं झालं आहे, असे वाटायला लागते. ही गोष्ट वाटण्यापूर्तीच मर्यादित राहत नाही तर, ज्या दिवशी बुद्धीचा निश्चय होईल त्या क्षणी ती व्यक्ती यहलोकीची जीवन यात्रा संपविते. एक ना एक दिवस जायचं तर प्रत्येकालाच असते, परंतु असे अविचारी निर्णय घेऊन स्वतः ची जीवन यात्रा संपविणे हे मनुष्य प्राण्याला सहज व सोपे वाटायला लागले आहे.**

याचे कारण ही अगदी तसेच आहे आपल्या अवतीभवती सोशल मीडियावर आपणास पहावयास मिळते की, विद्यार्थी दशेत असणारे मूल मग ते चौथी- पाचवीत शिकत असणारा विद्यार्थी, रागाच्या भरात निर्णय घेतो व सुंदर आयुष्याची माती करतो. मनुष्यप्राणी कष्टाने जीवन जगतो, परंतु एका चुकीच्या निर्णयाने स्वतःचे व कुटुंबाचे कष्ट मातीमोल ठरवितो. मग क्षेत्र कोणतेही असो प्रत्येकाचा स्वतःच्या इंद्रियावरचा ताबा सुटत चालला आहे, म्हणजेच मानवाची सहनशीलता, संयम आणि विवेक जवळजवळ संपत चालला आहे. विद्यार्थी अभ्यास करायच्या वेळी कष्ट घेत नाही मग निकाल मनासारखा नाही लागला म्हणून जीवन संपवतो. तरुणाई तर साध्या शुल्लक कारणास्तव आपलं जीवन संपवते. उदा. मैत्रिणीने फसवलं, मित्रांने फसवलं, पालकांनी गाडी घेऊन देण्यास नकार दिला, मोबाईल नवीन घेऊन नाही दिला, व्यसनाधीनता, वाढता चंगळवाद अशा क्षणिक प्रसंगाचा अविचार करून जीवन यात्रा संपवितात. तेव्हा नक्कीच असा विचार येऊन जातो, जीवन जगण्यापेक्षा मरण सहज सोपं झालं आहे का? का संकटाचा सामना धैर्याने नाही करता येत? अविचारांचं काहूर का माजतं? आपल्या जाण्याने प्रश्न सुटतील का? वाढतील याचा विचार का मनात येत नाही? याचा अर्थ आपली संगत चांगली नाही. सकारात्मक विचारांची संगत असेल तर कोणताही मनुष्य प्राणी नकारात्मक विचार करणारच नाही. जेव्हा स्वतः च्या विचार चक्रात सदैव नकारात्मक विचार चालू असतात तेव्हा एक क्षणभर विचार करून आपण चिंतन केलं पाहिजे की मी चुकीचा आहे की माझी संगत चुकीची आहे, ज्यावेळी चूक लक्षात येईल तेव्हा आपण कोणत्याच क्षणी जीवन यात्रा संपविण्याचा विचार करणार नाही. ज्यांना नाही ठरवता येत मी चुकीचा आहे की, माझी संगत चुकीची आहे, अशा व्यक्तींनी फक्त आपला अधिकाधिक वेळ आई-वडिलांच्या सहवासात घालावावा. म्हणजेच ठरवता काहीच नाही आलं तरी चुकीचा निर्णय तुमच्याकडून होणंच शक्य नाही. तरुणाई ही सर्वात जास्त या जीवन यात्रा संपवण्याच्या जाळ्यात अडकली आहे. मित्र नाही बोलत मग दे जीव, मैत्रीण दुसऱ्या सोबत असते मग काय दे जीव, आई वडील बंधनं घालतात..., पेपर कठीण गेला..., नापास झालो..., मित्रपरिवार रॅगिंग करतो..., आई-वडिलांचा राग येतो..., आई वडील बोललेलं सहन नाही झालं...,अनैतिक गोष्टी करताना आई-वडिलांनी पाहिलं दे जीव. अरे चाललय काय? ज्या आई-वडिलांनी आपल्याला कठीण परिस्थितीत लहानाचं मोठं केलं, त्यांना ज्या सुख सुविधा मिळाल्या नाही, त्या सर्व सुविधा मुलांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला, त्याच आई-वडिलांचा राग येतो. अशा आई-वडिलांना तुमचं चुकलंय असं म्हणण्याची पण सोय राहिली नाही. आधीच्या पिढीत मुलं आई-वडिलांना आदर युक्त घाबरायची, आजही ते आपल्या आई वडिलांना घाबरतात, परंतु आजची पिढी आई-वडिलां ला घाबरविते, धमकावते मरणाची- घर सोडण्याची धमकी देते, त्यावेळी हतबल झालेले आई-वडील माघार घेतात. तुला हवं तसं जग फक्त अविचार करू नको अशी विनंती करतात.


आपल्याच आई-वडिलांनी आपल्या जन्म दिलेल्या मुलासमोर हात पाय जोडावे, त्यांना विनंती करावी, यापेक्षा दुर्दैव ते काय असू शकते. स्व कष्टाने समाजात मान सन्मान मिळवणारे, कठीण परिस्थितीवर मात करून संस्कारांच्या जोरावर रुबाब करणारे, अविचारी मुलासमोर लाचार होतानाचं चित्र पाहताना डोळ्यातल्या अश्रूंचा बांध फुटत राहतो. आतापर्यंत चट्टाणासारखं उभं



राहून कठीण प्रसंग झेलणारी, घरातील दैवत जेंव्हा सशाच्या काळजाची होतात तेंव्हा थोडा विचार झालाच पाहिजे. उतारवयाचे सुखाचे क्षण आनंदान घालवण्याऐवजी भीतीनं जगतात, पोरगा काय करून घेईल काय? मुलगी चुकीचं पाऊल टाकेल काय? आजची तरुण पिढी मोबाईल व मीडियाचा अतिरेक यामुळे भावनाशून्य झालेली आहे. डिजिटल दुनियाच्या चक्रव्यूहात अडकलेला प्रत्येक जण शीघ्रकोपी झाला आहे, त्याला स्वतःच्या क्रोधावर नियंत्रण ठेवता येत नाही. वरून दिसायला शांत पण, आत मात्र मनाच्या गाभाऱ्यात ज्वालामुखी सतत प्रज्वलित आहे, त्यामुळेच विनाश अटळ आहे. रात्रभर जागरण करणं, जेवताना-बसलेला असताना मोबाईल सोबत असणं, 24 तास मोबाईल सोबत त्यामुळे विचारशक्ती पूर्णपणे बंद पडली आहे. दिवसभरात आपण मोबाईलला जे पाहतो, जे ऐकतो त्याचा अधिक प्रभाव आपल्या विचारांवर वर्तनावर अधिक पडतो व तो अधिक काळ टिकून राहतो देखील, म्हणून सांगतात घरातील व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद साधा, एखादा छंद जोपासा, कुटुंबातील व्यक्तींना भेटत राहा, त्यांच्या सहवासात अधिक कालावधी गेला की लक्षात येईल आपण अनमोल असणारे नाते हरवत चाललो आहे , आणि एकाकी जीवन जगत आहोत. आणि या एकाकीपणामुळेच आपण नकारात्मक वृत्तीच्या अधीन जातो आहोत त्याचा अंतिम विचार म्हणजे जीवन यात्रा संपविणे किंव्हा हृदय विकाराच्या झटक्याने संपली जाणे, आणि आई-वडिलांच्या दुःखात भर घालणे.

जेव्हा अशा घटना पाहत असतो ऐकत असतो, त्यावेळी प्रत्येक पालकाच्या मनात एकच विचार येत असेल यांना काय कमी केलं आहे, या मुलांना आपण काय द्यायला कमी पडलो तर, त्यांना स्वतःचा पालक म्हणून वेळ द्यायला कमी पडलो. त्यांच्या चुकीच्या गोष्टींचा भीतीपोटी समर्थन केलं, तेव्हा त्याला योग्य विचार द्यायला कमी पडलो. प्रगतीच्या मागे धावताना पैशाने प्रत्येक गोष्ट तोलली परंतु संस्कारांचं मोल द्यायला कमी पडलो. डिग्र्यांचा आलेख वाढविताना नात्यांची जाणीव करून द्यायला कमी पडलो. आपल्या संस्कृतीचं मूळ पाया म्हणजेच थोरां- मोठ्यांचा आदर, त्यांचा आशीर्वाद, संस्कार, नात्यांची घट्ट वीण जपणारे कुटुंब, वारसा हक्काने देण्यासारखी संस्कारांची शिदोरी, विचारांची परिपक्वता, जबाबदारीची जाणीव जेव्हा या गोष्टी पालक स्वतः करतील आणि मग हे आजच्या पिढीला देतील तेव्हा संपूर्ण नाही पण मोठ्या प्रमाणात चित्र बदललेलं पहावयास आपल्याला मिळेल आणि तेव्हा जाणवेल पैसा कमी पण आनंद अधिक असेल प्रत्येक कुटुंबात.

# परीक्षा



सुरेश काका चौधरी
संपर्क क्र. 70202 53948

आधुनिक केसरी

**एका आयोजित व्याख्यानांत वक्त्याने अचानक मध्येच श्रोत्यांना प्रश्न विचारला, बंधू भगिनींनो मला आपणा सर्वांना एक विचारायचं आहे, अशा श्रवणीय व्याख्यानात मंत्रमुग्ध, एकाग्र झालेले श्रोते या प्रश्नाने विचलित झाले, गडबडून गेले, गोंधळून गेले. आणि एकमेकाकडे पहात राहिले. मला आपणास हे विचारायचे आहे आपण सर्व सुशिक्षितच नव्हे तर उच्च शिक्षित देखील आहात कुणी पीएचडी असतील कायदे तज्ञ असतील, डॉक्टर्स, इंजिनीयर प्राध्यापक वगैरे असतील तेव्हा हे सांगा आतापर्यंत आपण ज्या काही परीक्षा दिल्या आहेत किंवा देत आहात त्यात सर्वात जास्त अभ्यास, त्रासदायक अभ्यास असणारी मानसिक ताण वाढविणारी आत्मविश्वास कमी करणारी यशासाठी अत्यंत कठोर परिश्रम घ्यावे लागतील अशी परीक्षा कोणती वाटते ?**

सांगता येईल? ज्यांना जे योग्य वाटेल ते उत्तर द्या! या अजब प्रश्नावर एक भयानक शांतता पसरली वक्त्यांनी दोन मिनिटे वाट पाहिली.

कुणी नाही उत्तर देऊ शकत? वक्ते म्हणाले, ओके ! मग मलाच याच उत्तर द्यावं लागेल,

तेव्हा एकानं आपला हात दर केला, "वैद्यकीय पदव्युत्तर प्रशिक्षण व त्याची परीक्षा खरोखरच अवघड वाटली. "त्यातल्यात्यात अर्थोपिडिक पदवीधर कोर्स दुसरा उद्गारला.

"अहो मेडिकलला जबरदस्त स्पर्धा, मग ते विषय डोळ्यांचे नाक, कान, घशाचे, तिसरा मध्येच म्हणाला अन इंजिनिअरिंग काय सहज उत्तीर्ण होण्यासारखं आहे होय ! पुन्हा एक प्राध्यापक म्हणाले. "ओके ओके त्यांनी चर्चा थांबविली.

अजून कुणी? मला वाटते, एक टोपीधारी नेहरू शर्ट धोतीवाले म्हणाले राजकारणात प्रामाणिकपणे जनतेची निस्वार्थ सेवा करणे हीच सर्वात जीवघेणी परीक्षा आहे साहेब" आता मात्र उत्तर देण्यासाठी स्पर्धा सुरू झाली प्रत्येकाला संधी देणे म्हणजे वक्त्यांनाच व्याख्यानां पासून थांबवणं असाच याचा अर्थ होता. त्यामुळे मात्र वक्त्यांनी दोन्ही हातांचे पंजे उंचावून ते म्हणाले. मी सर्वांच्याच उत्तराचा मनोमन आदर करतो. तरीही आता परीक्षेबद्दलचे माझे विचार मी आपणांसमोर मांडणार आहे.

प्लीज-प्लीज सभेतून एक पासश्ठ सत्तरीचे वयोवृद्ध उठून उभे राहिले व म्हणाले महोदय कृपया मला एक संधी द्या उत्तर देण्याची नंतर आपले विचार आपण मांडा, "ओके, वक्ते म्हणाले बोला काका काय मत आहे आपल अवघड परीक्षेबद्दल ?"

"कुणाला पटो अथवा ना पटो खणखणीत आवाजात आजोबा म्हणाले. सर्वात अत्यंत अवघड त्रासदायक व जीवघेणी परीक्षा असते आपल्या नव्हे सर्वांच्या जीवनाची क्षमा करा, मी माझ्या मतावर ठाम आहे आणि ही परीक्षा प्रत्येक पुरुष महिला देत असते. नव्हे द्यावीच लागते. मग ती व्यक्ती सुशिक्षित असो वा निरक्षर. अभिनंदन आजोबा वक्ते आनंदाने म्हणाले या या असे मंचावर या ते गृहस्थ सावकाश मंचावर गेले, त्याचा हात धरून स्टेजवर चढवीत ते श्रोत्यांना म्हणाले या काकांच्या मला अपेक्षित असलेल्या १०० टक्के करेक्ट उत्तराबद्दल जोरदार टाळ्यानी आपण यांचे स्वागत करूया वक्त्यांच्या या आवाहनाला जोरदार प्रतिसाद मिळाला.

टाळ्यांचा कडकडात थांबल्यानंतर त्यांनी गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले व त्यांचा परिचय करून घेतल्यानंतर सभेसमोर त्यांचा परिचय करून दिला. नारायण विश्वनाथ सहस्त्रबुद्धे त्याच नाव, एम. ए. बीएड त्यांचे शिक्षण व शिक्षकी पेशात ते सेवानिवृत्त झाले होते, त्यांच्या चरणी वक्ते नतमस्तक होऊन म्हणाले, "बंधू भगिनीनो आज 5 सप्टेंबर शिक्षक दिन काय योगायोग आहे पहा आजच्या या पवित्र दिनाचा.

प्रमुख वक्त्यानी तशी व्याख्यानाला अगोदरच सुरुवात केली होती. परीक्षा हाच खर तर त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. सुरुवातीला बोलताना ते म्हणाले होते, शैक्षणिक परीक्षे व्यतिरिक्तही आम्हाला इतरही अनेक परीक्षांना सामोर जावे लागत असतं मात्र शैक्षणिक परीक्षेत अपयश मिळाल्यानंतर दुर्दैवाने काही आत्महत्या करतात. हा मुद्दा प्रकर्षाने मांडताना अचानक त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता सर्वात अवघड परीक्षा कोणती? आणि आता या आजोबाकडून अपेक्षित उत्तर मिळाल्यानंतर त्यांनी पुढील व्याख्यान सुरू केल होत. त्यांनी आजोबाच्या उत्तराच समर्थन करताना आपल्या जीवनाची परीक्षा हीच अत्यंत अवघड परीक्षा असते हा विषय पटवून देत ते सांगत होते आपल्या जीवनाची खरी परीक्षा आपलं आयुष्य अर्ध्यावर संपल्यानंतरच सुरू होते तर काहींची परीक्षा बालपणी सुद्धा सुरू होते आईच / वडिलाचं किंवा एका पाठोपाठ वर्ष दोन वर्षांच्या कालावधीत दुर्दैवाने आई-वडिलांचे कृपाछत्र नष्ट होणं, पोलीओनं दिव्यांग होणं, कुठेतरी कुणाच्या तरी आधारावर शारीरिक कष्ट करीत मानसिक ताण सहन करीत अर्धपोटी राहुन आपले इप्सित ध्येय साध्य करणं किती कठोर असते ही जीवन परीक्षा कमी उत्पन्नात आपल्या संसाराचं व्यवस्थापन प्रसंगी कर्जबाजारी होणं, घरातल्या एखाद्या व्यक्तीचं ठाण मांडून बसलेलं आजारपण दवाखान्याचा न झेपणारा खर्च नोकरीसाठी वणवण भटकण्याची वेळ येणे. एकत्र कुटुंब असल्यास इतर विविध व्यक्तिमत्त्वाचे स्वभावातून निर्माण होणाऱ्या त्रासदायक समस्या, निद्रानाश एक का दोन असे असंख्य विषय जीवनाच्या परीक्षेत उपस्थित होत असतात. या भयानक व जीवघेण्या समस्यांची उत्तरे शोधता शोधता काही जण आजारी पडतात. काहींना हृदयविकार रक्तदाबाचे त्रास होतात, काहींचा हार्ट अटॅकने मृत्यू येतो तर काहीजण चक्क आत्महत्या करतात पण काहीजण शांत मनस्थितीत आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या कौशल्याचा उपयोग करीत ध्यान धारणेचा मार्ग स्वीकारून या जटील समस्यांच्या जंजाळातून खंबीरपणे यशस्वी होतात, यासाठी त्याचं शारीरिक, मानसिक व्यक्तिमत्व वाढतं वय, सामाजिक अनुभव, सकारात्मक मन, जिद्द, चिकाटी व जबरदस्त आत्मविश्वास हे गुण जीवनाच्या परीक्षेसाठी सतत, अशा यशस्वी माणसासमोर आपली मान झुकून उभे असतात.

# लोककल्याणकारी क्रांतिकारक संत तुकाराम महाराज

आधुनिक केसरी

संत तुकाराम महाराज यांचा जन्म 2 फेब्रुवारी 1608 रोजी पुणे जिल्ह्यातील देहू या गावी झाला. देहू हे गाव इंद्रायणी नदीच्या उजव्या काठावर आहे. संत तुकाराम महाराज यांचे वाडवडील हे मनोभावे वारकरी संप्रदाय आचरणारे होते. त्यांच्या मागील आठ पिढ्यापासून ते विठ्ठल भक्त होते. संत तुकाराम महाराज हे मोरे घराण्यातील आहेत. आंबिले हे त्यांचे उपनाम आहे. संत तुकाराम महाराजांच्या वडिलांचे नाव बोल्होबा तर आईचे नाव कनकाई होते.

संत तुकाराम महाराजांना दोन भाऊ होते. मोठा सावजी आणि धाकटा कान्होबा. तुकोबा हे आपल्या भावंडांवर जीवापाड प्रेम करत असत. मोठा भाऊ सावजी हा लहानपणापासूनच अत्यंत चिंतनशील आणि संवेदनशील मनाचा होता. ऐन तारुण्यामध्ये त्याने सर्वसंगपरित्याग केला. त्याला विरक्ती प्राप्त झाली. त्याने गृहत्याग करून परमार्थाचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे कुमार वयातच संत तुकाराम महाराजांवर संसाराची जबाबदारी पडली. संत तुकाराम महाराजांचे घराणे हे सधन शेतकऱ्याचे घराणे होते. त्यांचे वाडवडील हे सावकार आणि महाजन होते. महाजन म्हणजे बाजारातील वजन- मापे यावरती नियंत्रण ठेवणारे व बाजारपेठेतील कर वसूल करणारा अधिकारी होय. संत तुकाराम महाराजांनी पारंपारिक सावकारकी बंद केली. त्यांचे किराणा मालाचे दुकान होते, तसेच ते नामवंत शेतकरी होते.

संत तुकाराम महाराजांच्या पहिल्या पत्नीचे नाव रखुमाई, तर दुसऱ्या पत्नीचे नाव अवलाई तथा जिजाई होते. संत तुकाराम महाराजांच्या काळात मोठा दुष्काळ पडला होता. त्याप्रसंगी त्यांनी गोरगरिबांना धनधान्याचे मोफत वाटप केले. ते अत्यंत प्रेमळ आणि संवेदनशील मनाचे होते.

**जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।**
**तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणा ।**

ही त्यांची साधू आणि देव याबाबतची धारणा होती. गोरगरिबांना मदत करणे, हाच खरा धर्म आहे. हे त्यांचे धर्माचे तत्वज्ञान होते. संत तुकाराम महाराजांना महादेव, नारायण आणि विठोबा ही तीन मुले आणि गंगा, भागीरथी, आणि काशी या तीन मुली होत्या. त्यांचा संसार अत्यंत सुखाचा होता. परंतु सर्वांचा संसार सुखाचा असावा, यासाठी त्यांची धडपड होती. त्यांनी पत्नीला आणि मुलांना अत्यंत प्रेमाने वागविले. संत तुकाराम महाराजांच्या कार्याचा त्यांच्या पत्नीला आणि मुलांना प्रचंड अभिमान वाटत असे. त्यांनी उत्पन्नाचा खूप मोठा भाग गोरगरिबांना मदत म्हणून वाटप केला. याचा त्यांना प्रचंड आनंद वाटत असे. त्यांच्या या लोककल्याणकारी कार्यात त्यांचा पत्नीचा मोठा वाटा आहे, त्यांना आपल्या पतीचा प्रचंड अभिमान वाटत असे. कष्टकरी, कामकरी, शेतकरी, महिला यांच्या अधोगतीचे कारण अज्ञानामध्ये आहे त्यामुळे आपण ज्ञानी झाले पाहिजे, हा संत तुकाराम महाराजांचा आग्रह होता. ज्ञान हीच महत्त्वाची संपत्ती आहे, असे त्यांचे मत होते. म्हणून ते म्हणतात. **आम्हा घरी धन। शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे ।यत्ने करू।शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका।** संत तुकाराम महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रबोधन केले. त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची हिम्मत दिली. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, विषमता याविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. त्यांनी अभंग लेखन केले. सनातनी व्यवस्थेविरुद्ध बंड केले. त्यावेळेस सनातन्यांनी संत तुकाराम महाराजांची बदनामी करायला सुरुवात केली. संत तुकाराम महाराजांकडे प्रतिभा नाही. त्यांना संस्कृत येत नाही, अशी अवहेलना सुरू केली. तेव्हा संत तुकाराम महाराज सनातन्याना उद्देशून म्हणाले.

**वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा।**
**येरानी वाहवा भार माथी।।तुका तरी सहज बोले वाणी।त्याच्या घरी वेदांत वाहे पाणी।**
**।**

क्रमशः

# परिश्रमाच्या जोरावर संतोष निफाडे एन.एस.जी. कमांडो

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** देशसेवेची अतीव ओढ, जिद्द, चिकाटी आणि प्रचंड परिश्रम याची सांगड घालत निफाड तालुक्यातील सोनेवाडी बु.येथील शेतकरी कुटुंबातील सैनिक संतोष सखाहरी निफाडे याने निफाड तालुक्यातील पहिला एन. एस.जी कमांडो बनण्याचा मान मिळवला आहे.

कष्ट यशाला गवसणी घालण्यासाठी पुरेसे असतात असं म्हंटलं जातं. याशिवाय,' जितना बडा संघर्ष होगा, उतनी ही शानदार जीत होगी' या उक्तीचा प्रत्यय त्याच्या यशाने निफाड तालुक्यात आला आहे. शेतकरी कुटुंब त्यामुळे परिस्थिती हलाखीची. संतोष अभ्यासात हुशार. मात्र इतर आर्थिक प्राप्तीची नोकरी न स्वीकारता देशसेवा करण्याचा त्याचा ठाम निर्धार. कुटुंबीयांनी विरोध न करता त्याच्या इच्छेला वाव दिला. त्यानुसार त्याने सैन्यभरतीत जायचे ठरवले व सन जून २००६ साली निवडही झाली. त्याच्या १४ मराठा बटालियन मधील निवडीनंतर बेळगाव (कर्नाटक)



येथे एक वर्षाचे ट्रेनिंग पूर्ण केले. त्यानंतर त्याची शिपाई म्हणून ग्वाल्हेर मध्यप्रदेश येथे पोस्टींग झाली. त्यानंतर सियाचीन ग्लेशियर २ वर्ष, जम्मू आणि काश्मीर ३ वर्ष, गुजरात ३ वर्ष, लडाख २ वर्ष, पुन्हा जम्मू आणि काश्मीर ३ वर्ष, जम्मू ३ वर्ष अशी १७ वर्षे त्याने देशसेवा केली. याकाळात त्याने देशसेवेचे आव्हान पेलत अंतर्गत परीक्षा देत निवृत्तीपर्यंत लान्सनायक, हवालदार या पदापर्यंत मजल गाठली. त्यानंतर निवृत्ती न स्वीकारता नवीन आव्हान पेलत एन.एस.जी कमांडो होण्याचे स्वप्न मनाशी बाळगत एन.एस.जी ट्रेनिंगसाठी दिल्ली गाठली. या खडतर ट्रेनिंगमध्ये पहाटे ३.३० ला उठून रात्री १२ किंवा १ वाजेपर्यंत असे असे सुमारे वीस तास ट्रेनिंग चालत असे. रात्री केवळ १ ते ३.३० अशी केवळ साडेतीन तास विश्रांती मिळत असे. या ट्रेनिंगमध्ये देशभरातील ६५० जवान सामील झाले होते. खडतर ट्रेनिगमुळे केवळ २९५ जवान राहिले. त्यात संपूर्ण भारतातून उत्तम सैनिकांमधून जे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून विविध परीक्षांचे स्तर पूर्ण करून संतोषची झालेली निवड ही निफाड तालुक्याच्या दृष्टीने नक्कीच अभिमानस्पद आहे.

# जातेगावच्या वृद्ध महिलेचे दागिने लुटणारा अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** ग्रामीण पोलीस ठाण्यातील फुलंब्री पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महिला वृद्धेला लुटणारा आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने अटक करण्यात आले.

फिर्यादी नामे जनाबाई भागीनाथ मानकापे वय ७० वर्षे व्यवसाय शेती व घरकाम रा. जातेगाव ता.फुलंब्री जि.औरंगाबाद यांनी पो.स्टे ला तक्रार दिली की, दिनांक १८/०९/२०२३ रोजी दुपारी १३.३० वाजेच्या दरम्यान राहते घरा समोर एका अनोळखी इसमाने फीर्यादीस लोटलाट व मारहान करुन जबरदस्तीने फिर्यादीच्या अंगावरील सोन्या चांदीचे दागीने बळजबरीने हीसकावून घेउन गेला वगैरे - मजकुराचे फिर्याद वरुन पो.स्टे फुलंब्री येथे गु.र.क्र ३६७ / २०२३ कलम ३९४ भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. मा. मनीष कलावानिया, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेवून वरील नमूद गुन्हयाचे समांतर तपास करण्याचे आदेश चे स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले. श्री सतीष वाघ पोलीस निरीक्षक, स्था. गु. शा औरंगाबाद ग्रामीण यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, सदर गुन्हा हा सादिक शहा रफिक शहा, रा. रहेमानिया कॉलनी, औरंगाबाद याने केला असल्याची माहीती मिळाली. यावरुन स्थानिक गुन्हे शाखा यांचे पथकाने सदर आरोपीतांचा शोध घेतला असता इसम नामे सादिक शहा रफिक शहा वय ३० वर्षे रा. रहेमानिया कॉलनी, गल्ली नंबर ९, औरंगाबाद हा मिळून आला. त्यास विश्वासात घेवून सदर गुन्हया बाबत विचारपूस करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केल्याने त्याचे कडून गुन्हयात वापरलेली मो.सा किमती ८०,००० /- रु.ची जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीस पुढील तपास कामी पो.स्टे फुलंब्री यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पो.स्टे फुलंब्री करत आहे. सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. मनीष कलवानिया, अपर पोलीस अधीक्षक श्री. सुनिल लांजेवार यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सतीष वाघ सहायक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे पो.उप.नि. भगतसिंग दुलत, पोह/ नामदेव सिरसाठ, दिपेश नागझरे, संजय घुगे, वाल्मिक निकम, पोना / अशोक वाघ, पोअ / योगेश तरमाळे, जीवन घोलप, चापोअ / संजय तांदळे यांनी केली.

# सरपंच अमरनाथ श्रीखंडे याच्या हस्ते सैन्यदलात भरती झालेल्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपुर भाडेगाव या गावामधील गरीब घराण्यातील तीन मुलांचे इडियन आर्मीमध्ये नुकतीच भरती झाली. त्यामध्ये विकास अप्पाराव वेताळ, गणेश सजय नन्नोरे, सचिन मच्छिंद्र चव्हान, यांचा ग्रामपंचायत सुलतानपुर याच्यातर्फे सत्कार सोहळा ठेवण्यात आला यावेळेस सरपंच अमरनाथ श्रीखंडे, मा. उपसरपंच आसेफ भाई शेख, पहेलवान अविनाश वेताळ, तातेराव कोतकर, बाबासाहेब मालोदे, पत्रकार नईम शहा, शुभम जाधव, वैभव चव्हान, कलीम शेख,व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.





# महिलांसाठी 33 टक्के जागा राखीव, मोदी सरकारने घेतला ऐतिहासिक निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा आणि विधानसभेत आता महिलांसाठी 33 टक्के आरक्षण मंजूर करून जागा राखीव केल्याबद्दल मोदी सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयाचे सर्व महिलांच्या वतीने भाजपा मध्यवर्ती कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे महिलांनी पेढे वाटून फुगडी खेळून एकमेकींना शुभेच्छा देत जल्लोष साजरा करत मोदीजींचे व केंद्रीय भाजपा सरकारचे खूप खूप अभिनंदन केले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री माननीय नामदार अतुलजी सावे साहेब, भाजपा राष्ट्रीय सचिव विजयाताई रहाटकर, भाजपा संघटन मंत्री संजयजी कौडगे साहेब, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय जी केनेकर साहेब, भाजपा शहराध्यक्ष शिरीष बोराळकर, प्रवीण जी घुगे, भाजपा महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस सौ.मीनाताई मिसाळ, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे, सौ.शालिनीताई बुंदे,प्रदेश सरचिटणीस सौ.माधुरीताई अदवंत, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस सौ. ऐश्वर्याताई गाडेकर, शहराध्यक्षा सौ. अमृता ताई पालोदकर,शहर ऊपाध्यक्षा सौ. मनिषा ताई भन्साळी, जिल्हा सरचिटणीस सौ. गंगाताई ताठे, सौ.मनीषा ताई मुंडे व असंख्य पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# जालना जिल्ह्यातील सात तालुक्यांत 'गाथा मुक्तिसंग्रामाची'

## आज 25 सप्टेंबरला जालन्यात नाट्यप्रयोग

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठवाडा मुक्तीलढ्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या संस्कृतिक संचालनालयाच्या वतीने मराठवाड्याच्या 8 जिल्ह्यातील सर्व 76 तालुक्यांच्या प्रमुख ठिकाणी डॉ. सतीश साळुंके आणि ॲड. शैलेश गोजमगुंडे लिखित गाथा मुक्तिसंग्रामाची या दोन अंकी नाटकाचे प्रयोग होणार आहेत.

जालना जिल्ह्यातील प्रयोगाचे सादरीकरण सम्राट नाट्यसंस्था व सांस्कृतिक मंडळ धाराशिव ही संस्था करणार असून याचे दिग्दर्शन डॉ. सुधीर निकम यांनी केले आहे. व्यवस्थापन रामेश्वर झिंजुर्डे यांचे आहे. दररोज सायंकाळी 7 ते 9 या वेळेत सादर होणाऱ्या या नाट्यप्रयोगांचे वेळापत्रक असे आहे... 24 सप्टेंबर अहिल्यादेवी नगर परिषद सभागृह परतूर, 25 सप्टेंबर जे. ई. एस. महाविद्यालय जालना, 26 सप्टेंबर कै. गणपतराव पवार प्राथमिक शाळा बदनापूर, 27



सप्टेंबर नगर परिषद मंगल कार्यालय भोकरदन, 29 सप्टेंबर संत रामदास महाविद्यालय घनसावंगी, 8 ऑक्टोबर सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद, 11 ऑक्टोबर वसंतराव नाईक सभागृह मंठा येथे संपन्न होणार आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये नाट्यप्रयोगाची आखणी करण्यात आली असून सर्व नाट्यप्रयोगांचे संयोजक त्या त्या तालुक्यांचे तहसीलदार असून पूर्वनियोजनासाठी सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खरगे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चावरे, उपसंचालक श्रीमान पांडे, शासकीय समन्वयक मिलिंदजी बिरजे आदी परिश्रम घेत आहेत. जिल्ह्यातील सर्व प्रेक्षकांनी या नाटकाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी केले आहे.

# जोरदार पावसाने लावली म्हैसमाळ रस्त्याची वाट, पर्यटकांची दमछाक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात झालेल्या दि.२३ उतरा नक्षत्राच्या जोरदार पावसाने ठिकठिकाणी रस्त्याची अक्षरशः वाट लावुन टाकली असुण याचा वाहतुक पर्यटकांची दमछाक होत आहे. मिनी महाबळेश्वर थंड हवेचे ठिकाण व निसर्गरम्य आसलेल्या म्हैसमाळ येथे डोंगरातील रस्त्यांची सांड पाण्याने रस्ताच उखडून फेकला असुण शनिवारी रविवारी पर्यटकांची अक्षरशः हाल झाले आहे. दुष्काळात तेरावा महिना असी या म्हैसमाळ रस्त्यांची गत झाली आहे.व गत अनेक वर्षा पासून या रस्त्याची दुरावस्था सुरु आहे. यात सांड पाण्यासाठी चारी न काढल्याने सांड पाण्याने रस्ताच उखडून टाकला आहे. व नादुरुस्त रस्त्यांमुळे सद्या पर्यटकांचे हाल होत आहे यांकडे सा.बां.विभागाने तातडीने लक्ष रस्ता दुरुस्त करावा असी मागणी आहे.तर ठिकठिकाणी जोरदार मुसळधार पावसामुळे रस्त्यांची वाट लागली आहे.





# कन्या दिनानिमित्त मुलींचा सत्कार

## माजी सभापती भाऊसाहेब काकडे यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** दरवर्षी 25 सप्टेंबर हा जागतिक कन्या दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. पालक आणि मुलींच्या नात्यातील समर्पित भावना टिकून राहावी व समाजात मुलींना समानतेची वागणूक मिळावी या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. भोकरदन तालुक्यातील राजूर येथे माजी सभापती भाऊसाहेब काकडे यांच्या पुढाकारातून एमबीबीएससाठी पात्र ठरलेल्या यशस्वी मुलींचा सत्कार करून जागतिक कन्या दिन उत्साह साजरा करण्यात आला.

2023 मध्ये झालेल्या नीट परीक्षेची नुकतीच निवड यादी जाहीर झाली असून त्यामध्ये स्नेहल रामकृष्ण पारवे, गायत्री लक्ष्मीकांत टाकळकर,वैष्णवी संदीप पडोळ, गणेश भीमराव माने आदींची एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाली आहे. जागतिक कन्या दिनानिमित्त यशस्वी मुलींचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजीराव थोटे, माजी सभापती गजानन नागवे, भाऊसाहेब काकडे, माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, उपसरपंच विनोद डवले, व्यापारी संघाचे अध्यक्ष सारंगधर बोडके, विठ्ठलराव टेपले, केंद्रप्रमुख रमेश राऊत, शिवाजी बांदल, प्रा.आसाराम बोटुळे, पत्रकार राम पारवे, प्रा. बाळासाहेब बोराडे, संदीप पडोळ, भीमराव माने, लक्ष्मीकांत टाकळकर, लक्ष्मण कांबळे,सय्यद रफिक आदींच्या हस्ते मुलींचा सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद रफिक यांनी केले तर मा.सभापती भाऊसाहेब काकडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# जुगार अड्ड्यावर उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांची धाड

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** जुगार अड्ड्यावर उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांची धाड : ५१ आरोपींना अटक अंदाजे ७ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त स्थळावरुन दोन कुझर गाडीमध्ये भरुन आरोपींना पकडून पोलिस स्टेशनला आणण्यात आले. सदरील घटना आज दि. २३ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता उमरी गोरठा वाय पाईटवर पहेलवान ढाब्यावर घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. पत्ते खेळणारे पन्नासहून जास्त होते त्यात कांही सरकारी नोकरी करणारे मोठे व्यापारी असल्याचे चर्चा असून पोलिस माहिती देण्यास तीन ते चार तास लावले धाडीत पोलिस निरीक्षक, सपोनी रविंद्र उमरी गोरठा वाय पाईटवरील पहेलवानचा डागा येथे पत्याचा डाव चालू असल्याची गुप्त माहिती पोलिस अधिकाऱ्यांना मिळाली असता उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपते यांच्या पथकांची व सोबत उमरी पोलिसांच्या मदतीने पत्याच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून ७ लाख २२ हजार रूपयांचा मुद्देमाल व ५१ आरोपींना अटक करण्यात आली.यातील बरेच पत्ते खेळणारे आरोपी पळून गेले पकडलेल्या आरोपींना घटना करे या धाडीत उपस्थित होते. रात्री उशिरापर्यंत उमरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू असल्याची माहिती सपोनी रविंद्र करे यांनी दिली आहे.



# भुजबळांनी घेतले मुन्ना शेख यांच्याकडील गणेशाचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी गणेशोत्सवानिमित्त पुरणगाव येथील मुन्ना शेख यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. यावेळी शेख यांच्या घरी विराजमान झालेल्या श्री गणेशाचे पूजन करत दर्शन घेतले. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधून गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, गणेश उत्सवाच्या माध्यमातून मुन्ना शेख यांनी हिंदू मुस्लिम ऐक्याची परंपरा कायम जोपासली आहे. त्यांचं व त्यांचं कुटुंबाच हे सामाजिक ऐक्याचे काम अतिशय कौतुकास्पद आहे. यापुढील काळातही त्यांचं हे काम सुरू राहील असे सांगत त्यांना या उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, प्रा. ज्ञानेश्वर दराडे यांच्यासह शेख कुटुंबातील सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गडचिरोली पोलिसांनी घातपाताचा डाव उधळला

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** नक्षलवादी संघटनेच्या १९ व्या वर्धापन सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी घातपाताचा डाव उधळला असून कोरची तालुक्यातील बेडगाव घाट जंगल परिसरात जमिनीत पुरून ठेवलेली स्फोटके जप्त करण्यात त्यांना यश आले आहे. गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी विशेष पथकाने ही कारवाई केली. नक्षलवाद्यांच्या १९ व्या वर्धापनदिनानिमित्त २१ सप्टेंबरपासून सप्ताहाला सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नक्षलवादी सक्रिय झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांना धमकीचे पत्रक, नंतर सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी भामरागडमध्ये हिंदेवाडा रस्त्यावर कापडी फलक लावून नक्षल्यांनी उघड आव्हान दिले होते. कुरखेडा उपविभागाअंतर्गत बेडगाव पोलीस मदत केंद्र हद्दीत पुराडा पोलीस ठाण्यातील जवान नक्षलविरोधी अभियान राबवित होते. कोरची व टिपागड दलमच्या नक्षलवाद्यांनी मोठा घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात स्फोटके व इतर साहित्य पुरून ठेवले असल्याची माहिती मिळाल्यावर 'डीएसएमडी' उपकरणाद्वारे जंगल परिसरात शोधमोहीम राबवली. त्यानंतर एक संशयितस्थळी बीडीडीएस पथकाला पाचारण केले. घटनास्थळी जमिनीत अंदाजे दीड ते दोन फूट खोल स्फोटक पदार्थ भरून असलेले ४ पाकीट आढळून आले. त्यात ११.८ किलो स्फोटके होती. पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक (अभियान) अनुज तारे, कुमार चिंता, यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुराडा ठाण्याचे सहायक निरीक्षक भूषण पवार व जवानांनी ही कारवाई केली. बेडगाव ठाण्यात गुन्हा नोंद केला.

# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल दरेगाव येथे मराठवाडा मुक्तिदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव येथे मराठवाडा मुक्तिदिनचा कार्यक्रम साजरा करण्यात आला सकाळी कार्यक्रमाची सुरुवात मुलांच्या प्रभात फेरीने करण्यात आली. त्यानंतर शाळेत या कार्यक्रमासाठी गावातील ज्येष्ठ नागरिक लक्ष्मणराव गायकवाड तसेच माजी सैनिक यांच्या पत्नी मालनबाई खुटे शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळ यांनी प्रतिमा पूजन करून सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक यांनी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत पुष्पहार देऊन करण्यात आले. यानंतर मालनबाई खुटे व लक्ष्मण पाटील गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर कवायत व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक यांनी मुलांना मार्गदर्शन करताना निजामाची निजामशाही मध्ये लोकांवर होणारे अन्याय या अन्यायाला वाचा फोडणारे स्वामी रामानंद तीर्थ यांनी गावागावांमध्ये लोकांना धीर देत संघटना तयार करून निजामाच्या विरोधात लढण्यासाठी स्वातंत्र सैनिकांचा जमावडा करून निजामाला त्यांच्या रजाकार शाहीस प्रतिकार देऊन सत्ता उलथून पाडण्यात मदत केली अशाप्रकारे विस्तृत माहिती देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री. शिवाजी पडुळे यांनी केले या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक कारभारी साळुंखे ,



यशवंत पाटील , विष्णू गायकवाड, रवींद्र पवार, डॉ. बाळासाहेब निंभोंरे , किरण ताकटे, राजू बनसोडे, संतोष शिंदे संजय देवकर, दत्तू गायकवाड, भरत काळे, रंजनाताई गायकवाड गावातील नागरिक बाळू खुटे, विश्वनाथ गायकवाड इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी शाळेचे शिक्षक शांताराम कापडणे यांनी आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

# शिवसेना विधानसभा संघटक अक्षय खेडकर यांच्या निवासस्थानी गणरायाची आरती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** औरंगाबाद शहरातील व फुलंब्री शिवसेना विधानसभा संघटक अक्षय खेडकर यांच्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे इको फ्रेंडली गणपतीची प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. या वर्षी सरिता अक्षय खेडकर यांनी स्वतःच्या हाताने इको फ्रेंडली गणपती तयार करून पर्यावरणाचे महत्त्व जोपासण्याचा प्रयत्न केला, सदरील गणपतीच्या निमित्ताने पुढील काही दिवस फक्त महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्यांच्या मातोश्री लता खेडकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली त्यांनी भक्ती भावाने गणरायाकडे साकडं घातले की फुलंब्री मतदारसंघातील बळीराजा सुख समृद्धीने नांदू दे व हे दुष्काळाचे संकट लवकरात लवकर टळू दे अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी उपस्थित विधानसभा संघटक अक्षय खेडकर, सरिता खेडकर, अविनाश खेडकर, साधना खेडकर सुनील राठोड, संतोष काकडे, अजय चव्हाण, सुनील चव्हाण, अनिल हुसे, सागर राठोड व इतर शिवसैनिक उपस्थित होते.




हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

राजस्थानी मल्टीस्टेट
मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate
MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# पंधराव्या शब्दगंध साहित्य संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : गोसावी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने ७ व ८ ऑक्टोंबर रोजी अहमदनगर येथे ज्येष्ठ साहित्यिक, माजी सनदी अधिकारी डॉ. पुरूषोत्तम भापकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या पंधराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात मान्यवरासह नवोदित साहित्यिकांना सामावून घेण्यात येणार असल्याने साहित्यिक व साहित्य रसिकांनी या संमेलनास उपस्थित रहावे असे आवाहनशब्दगंध चे संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी केले.
शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या औरंगाबाद जिल्ह्यातील सभासद व साहित्यिकांच्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयांत बैठकीत ते बोलत होते. यावेळी संस्थेचे खजिनदार, लोककला अभ्यासक भगवान राऊत, प्रा.डॉ. गणी पटेल, डॉ.शेषराव पठाडे, डॉ संजय पाईकराव, तानाजी शेटे, सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी गोविंद पायघन,संयोजन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडूळे, कार्याध्यक्ष प्रा डॉ.अशोक कानडे, ठाणे जिल्हा समन्वयक भानुदास वाघमारे, नाशिक चे समन्वयक विलास कातकडे इ मान्यवर उपस्थित होते. वीस वर्षांपूर्वी नवोदित लेखकांसाठी सुरू झालेली ही साहित्यिक चळवळ आता सर्वदूर पोहचली असून या चळवळीच्या माध्यमातून अनेकांना लिहिते करण्याचे काम झालेले आहे. या चळवळीतील अनेक साहित्यिकांना वेगवेगळ्या विचार पिठावर संधी मिळत असून अनेकांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.शब्दगंधने आतापर्यंत 250 पुस्तकांचे प्रकाशन केलेले असून त्यातील काही पुस्तके विद्यापीठस्तरावर




अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून तर काही शासनाच्या ग्रंथ खरेदीत खरेदी झालेली आहेत.
राज्यातील सर्व सभासदांना विचार मंथन करता यावे, एकत्र भेटता यावे यासाठी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन सुरू झालेले असून यापूर्वीचे १४ संमेलने यशस्वीपणे पार पडलेली आहेत.
बिनविरोध संमेलनाध्यक्ष निवडण्याची परंपरा याही वर्षी कायम ठेवली असून ज्येष्ठ सनदी अधिकारी, साहित्यिक, कवी, गीतकार डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या निवडीने यावर्षी संमेलन एका विशिष्ट उंचीवर पोहोचणार आहे. या संमेलनाचे पूर्वाध्यक्ष म्हणून महाराष्ट्रातील ख्यातनाम कवी प्रा. फ मु.शिंदे, इंद्रजीत भालेराव, चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर,ज्येष्ठ विचारवंत डॉ.कुमार सप्तर्षी, आमदार कविवर्य लहू कानडे, प्रशांत मोरे, प्रकाश घोडके, भारत सासणे यांच्यासारख्या दिग्गजांनी संमेलनाध्यक्ष म्हणून साहित्य सेवा केलेली आहे.
या संमेलनात उद्‌घाटन,लोककला, लोकजागर साहित्य यात्रा, ग्रंथ प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद,चर्चासत्र,कथाकथन, दोन काव्यसंमेलने,वाङ्मय पुरस्कार वितरण, साहित्य स्पर्धा पारितोषिक वितरण व समारोप होणार असून एका सेलिब्रिटीची मुलाखतही होणार आहे, अशी माहिती भगवान राऊत यांनी दिली.
अहमदनगर शहराचे आमदार संग्रामभैय्या जगताप हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असुन या संमेलनाची पूर्वतयारी प्रगतीपथावर आहे. शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्यासह संयोजन समितीचे पदाधिकारी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.



# गौरी पूजननिमित्त 'चांद्रयान 3' पाहण्यासाठी महिलांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी ज्येष्ठ नक्षत्रावर गौरीचे पूजन केले जाते व तसेच दुसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरीचे विसर्जन केल्या जाते त्यानिमित्त महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केलेला असतो त्यानिमित्ताने पेठ विभागातील सुवर्णा गिरीश जोशी व ज्योती भानुदास जोशी यांनी गौरी पूजना निमित्य उभारलेल्या चंद्रयान 3 ची प्रतिकृती पाहण्यासाठी लहान बालके, आबाल वृद्ध व महिलांसह नागरिक गर्दी करीत आहेत. हुबेहूब चंद्रयान 3 दिसेल अशा आकर्षक पद्धतीने प्रतिकृती उभारली आहे. गौरी पूजना बरोबरच आपण आपली संस्कृती जतन करून विज्ञान गोष्ट सुद्धा अवगत केली पाहिजे व त्याचा प्रसार झाला पाहिजे व आपल्या भारत देशाची शान व त्याचा गौरव आपण गायला पाहिजे अशी प्रतिक्रिया भक्ती जोशी यांनी दिली ग्रामीण भागातल्या लोकांना सुद्धा चालीरीतीबरोबर विज्ञान युगी देश कसा निर्माण होत आहे याची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे असे ग्राम जोशी जनार्दन पंत म्हणाले चंद्रयान प्रतिकृती तयार करण्यासाठी भानुदास जोशी गिरीश जोशी भक्ती जोशी व संग्राम जोशी यांनी सहकार्य केले



# शालेय विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** ग्रामीण भागातील विद्यार्थी वेळेत शाळेत पोहचावे त्यांचे शालेय हित जोपासावे याकरिता शासनाने मानव विकास अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप सुरू केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येवती येथील बाहेरगावावरून पायी ये-जा करणाऱ्या मुलींना मानव विकास मिशन कार्यक्रमांतर्गत शासनातर्फे प्राप्त ७३ सायकलींचे वाटप करण्यात आले.
या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. भास्करराव सांगळे होते. तर प्रमुख पाहुणे प्राचार्य बी. एस. नागरे होते. यावेळी शिरपूर, कासारी, पार्डा, येवती गावातील पालक व विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकरराव राऊत यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.रविंद्र जाधव यांनी केले.

# १० हजार कमावले, पण ९२ हजार गमावले

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** घरबसल्या ऑनलाइन काम करून पैसे कमविण्याच्या नादात अभियांत्रिकीच्या एका विद्यार्थ्याने १० हजार रुपये कमावले; मात्र त्याबदल्यात त्याची ९२ हजार ८०० रुपयांनी फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अमित रावसाहेब शिरसाठ (२४) असे तक्रारकर्त्या युवकाचे नाव असून, तो मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी आहे. गेल्या २५ ऑगस्ट रोजी त्याच्या भ्रमणध्वनीवर रोशनी शहा नामक एका युवतीकडून ऑनलाइन जॉब संदर्भात संदेश आला. घरबसल्या दोन ते तीन हजार रुपये कमाविण्याची संधी असल्याचे त्यात म्हटले होते. अमितने त्यासाठी होकार दिल्यावर त्याला भारती मिश्रा नावाच्या आयडीवर संपर्क करण्याचे सांगण्यात आले. त्यानंतर भारती मिश्राने अमितला एका व्हॉट्स ॲप समुहावर सहभागी करून घेतले. तिथे वेगवेगळे टास्क दिले जात होते. यूट्युबच्या काही चॅनलला सबस्क्राईब करून त्याचे स्क्रिनशॉट समुहावर टाकायचे आणि त्याबदल्यात अमितच्या खात्यात प्रत्येकी ५० रुपये जमा करण्यात येत होते. प्रत्येक टास्कसाठी काही रक्कम अमितलाही भरायची होती. प्रत्येकवेळी टास्कची रक्कम आणि त्याला मिळणाऱ्या मोबदल्याचीही रक्कम वाढत होती.
अमितच्या खात्यात जवळपास १० हजार रुपये जमा झाले.




त्यानंतर ऑनलाइन चलन खरेदीसाठी पुन्हा खाते उघडायला सांगण्यात आले. अमितने ते खाते उघडल्यावर टप्प्याटप्प्याने त्याला ९२ हजार रुपये जमा करण्यास सांगण्यात आले. अमितनेही ती रक्कम भारती मिश्राने दिलेल्या खात्यात जमा केली. मात्र यादरम्यान आपली फसवणूक होत असल्याचे त्याच्या निदर्शनात आल्यामुळे त्याने सदर रक्कम परत मागितली त्यावेळी त्याची आयडी व ऑनलाइन खाते बंद करण्यात आले. त्यामुळे अमितच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी सदर प्रकरणी गुन्हा दाखल केला.

# शेतजमिनीला पोटभर पाणी नाही; पिकांची परिस्थिती साधारण विहिरी, नदी-नाले कोरडेच

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** गावापुरतेच नव्हे तर तालुक्यातील शेत जमिनीला पोटभर पाणी न मिळाल्याने सलाईन सारखी फवारणी होऊन सोयाबीन पीक साधारण आल्याचे चित्र दिसत असले तरीही पाहिजे, तसे उत्पन्न यावर्षीही शेतकऱ्यांना झडती लागणार नाही सुरुवातीपासून अल्प प्रमाणात पडणाऱ्या पावसाने खरीप हंगामातील सोयाबीन उडीद मुग भुईमूग तीळ तुर इत्यादी पिकांना फवारणीच्या स्वरूपात वेळोवेळी थोड्या प्रमाणात पाऊस पडल्याने कशीबशी पिके तरली असली तरीही भुरमुट्या शेतातील सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान दिसून आले आहे या ठिकाणी अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या शेंगा पावसाअभावी गळून पडल्या परिणामी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी पावसाने हजेरी लावल्याने कसेबसे काही प्रमाणातील सोयाबीन तरल्या गेली असली तरीही यावर्षी शेतकऱ्यांना पुन्हा झटका बसणार आहे मात्र अत्यल्प पावसामुळे उन्हाळ्यात पिण्याचा पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर होणारे चित्र असल्याने व विहिरी ओढे नाले,नदी अजूनही तहानलेलेच आहे. यावर्षी चारठाणा व परिसरातील सर्व परीसरातील सर्वच गावातील ओढ्यांना, नदीला, नाल्याला व बोर, विहिरींना पुरेसं पाणी अजूनही आलेला नसल्याने त्यात थोडेफार पाणी विहिरीत असताना शेतकऱ्यांना विजे आभावी सोयाबीनला पाणी देता आले नाही. त्यात वाढलेली सोयाबीन व अडीअडचणीला सामोरे जाऊन काही



शेतकऱ्यांनी पाणी देण्यासाठी प्रयत्नही केले परंतु अनियमित मिळणारा वीजपुरवठा त्यामुळे पूर्णतः दयनीय अवस्था निर्माण झाली आहे शेतकऱ्यांनी अनेक वेळा याबाबत जनप्रतिनिधी व विद्युत वितरण अधिकाऱ्यांना वेळोवेळी विनंती करूनही याचा फायदा झालेला नाही. शासनाचे आम्हाला काहीही नको परंतु निसर्गाची साथ हवी निसर्ग राजांनी शेतकऱ्यांना वेळोवेळी पावसाची मदत केली. यावेळी ही पावसाने पुन्हा पाठ फिरवली परंतु निदान काहीतरी आपला झालेला खर्च निघू शकेल या आशेवर शेतकरी थोडाफार सुखावलेला आहे. नाहीतर गोकुळाष्टमीच्या दिवशी आलेल्या पावसाने तोंड दाखविले नसते तर सर्वच सोयाबीनचे पीक नष्ट झाले असते यात शंका नाही शासनाच्या थोडक्या मदतीपेक्षा निसर्गाचा हात हवा यावर शेतकऱ्यांच जीवन अवलंबून असून निसर्गानेच आम्हाला तारावे यावर्षी चारठाणा परिसरातील अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करतो आहे.

# लोणार येथील मूलभूत समस्यांचे निवारण न झाल्यास नगरपालिकेस कुलूप ठोकू : डॉ.गोपाल बछीरे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** लोणार शहरातील मूलभूत सुविधा विषयी समस्यांचे निवारण न झाल्यास नगरपालिकेत कुलूप ठोकू असा इशारा शिवसेना उ.बा. ठा.चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे दिला. जिल्हाधिकारी लोणार येथे आढावा बैठकीस आले असता लोणार हे नगर जागतिक पर्यटक स्थळ म्हणून घोषित झाले आहे परंतु गावातील मूलभूत सुविधेकडे नगरपालिका सोयीस्करपणे डोळेझाक करीत आहे. गावातील नागरिकांना महिन्यातून एक किंवा दोन वेळा पाणीपुरवठा होतो व पाणीपट्टी ही संपूर्ण वर्षांची घेतली जाते. जनावर पिणार नाही असे गढूळ, गाळ आणि शेवाळ युक्त पाणीपुरवठा आपल्या नगरपालिकेकडून केला जात आहे व पर्याय नसणाऱ्या गोरगरिबांना ते दुषित पाणी इच्छा नसतांना प्यावे लागते आणि त्याकारणाने ते आजारी पडत आहेत यास सर्वस्वी जबाबदार आपले ढिसाळ प्रशासन आहे.पाणी स्वच्छ करणारा प्रकल्प लावल्या पासून बंद आहे तो कार्यरत नाही त्याचे काय कारण आहे तो त्वरित सुरु करण्यात यावा. गावातील मुख्य प्रताप चौक येथील तीस फुटाची नाली ही जमीन दोस्त झालेली आहे व त्या नालीतून मैला युक्त पाणी रस्त्यावर येत आहे आमचे जैन बांधव मंदिरात जात येत असताना मैला युक्त पाण्यातून वाट काढावी लागते त्याचबरोबर सध्या सणवाराचे दिवस आहेत गौरी गणपती दुर्गा उत्सव यांची मिरवणूक या मुख्य चौकातून जाते आणि सदरील मुख्य चौक हा मैला युक्त पाण्याने भरलेला आहे ते येत्या तीन दिवसात पूर्ण करावे. शिवाजी कॉलनी येथील मुख्य नालीत मिळणाऱ्या उपनाल्या जीर्ण झाल्या आहेत म्हणून मुख्य नातीत मातीचा भरणा होऊन त्या बंद झाल्या आहे उपनात्यांचे बांधकाम करून त्यातील पाणी मुख्य नालीत सोडण्यात यावे. या जागतिक पर्यटन स्थळाच्या गावात एकही रस्ता व्यवस्थित नाही सर्व रस्ते खराब झालेले आहेत याकडे नगरपालिका सोयीस्करपणे डोळेझ करीत आहे ते सर्व रस्त्यांचे काम पूर्ण व्हावेत.

या बाबींकरिता नगरपालिकेला अनेक निवेदन दिली आहेत उपोषण सुद्धा झाले आहे नगरपालिका ने फक्त आश्वासने देऊन उपोषण सोडले आहे काम मात्र एकही केले नाही. करिता आपली कल्पक बुद्धी वापरून उपरोक्त सर्व कामांची सुरवात येत्या आठ दिवसात करावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडून नगर पालिकेस कुलूप लाऊ असा गर्भित इशारा शिवसेना उ.बा. ठा.चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे दिला. याप्रसंगी बातमी डॉ. गोपाल बछिरे जिल्हा संघटक,

अँड. दीपक मापारी तालुका प्रमुख,गजानन जाधव सर शहर प्रमुख,कैलास अंभोरे तालुका संघटक,श्रीकांत नागरे तालुका उपप्रमुख,परमेश्वर दहातोंडे तालुका उपप्रमुख,तेजराव पायाळ संचालक कृ. ऊ.बा.स.

शाम राऊत माजी नगरसेवक,सुदन अंभोर सर शिवसेना नेते,गोपाल मापारी शिवसेना नेते,लुकमान कुरेशी शहर उपप्रमुख,उमर सय्यद तालुकाप्रमुख अल्पसंख्यांक, इकबाल कुरेशी शहर प्रमुख अल्पसंख्यांक,प्रसेनजित बछिरे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.





# फुले ज्युनियर कॉलेजमध्ये नावीन्यपूर्ण "माझे उच्चार - माझा प्रभाव" प्रकल्प सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** शब्दोचारावर व्यक्तीचा प्रभाव ठरत असतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे इंग्लिश भाषेतील उच्चार अस्खलित होण्यासाठी महात्मा फुले महाविद्यालयाने "माझे उच्चार - माझा प्रभाव" हा एक नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरू केला आहे. इंग्लिश विभागाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या या प्रकल्पात काही कार्यशाळा घेण्यात येऊन दोन महिन्यांच्या अवधीत विद्यार्थ्यांचे उच्चार सुधारण्यावर भर दिला जाणार आहे. प्रकल्पाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या उच्चाराचे परीक्षण करून अस्खलित उच्चार असणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देणार येणार आहेत.

संस्थाध्यक्ष क.रा. नवले गुरुजी, सचिव गोकुळ पाटील, प्राचार्य एन. आर. नवले व विभागप्रमुख प्रा. विजय वाघ यांच्या मार्गदर्शनातून सुरू झालेला हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या इंग्लिश शब्दोचाराला निश्चितच एक उंची देईल, असे इंग्लिश विभाग प्रमुख, डॉ. संजय गायकवाड यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# अविनाश धायगुडे पाटील अहिरे विकास सेवा सोसायटीची सर्वसाधारण सभेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज





**हेमंत धायगुडे**

**खंडाळा :** अहिरे, (ता. खंडाळा) येथील अविनाश धायगुडे पाटील अहिरे विकास सेवा सोसायटीची ९९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेच्या गोडाऊनमध्ये संस्थेचे चेअरमन भरत सर्जेराव धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.सर्वसाधारण वार्षिक सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. संस्थेच्या सर्व सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेला वेळेवर उपस्थित रहावे.पुरेश्या गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास,ती सभा त्याच दिवशी त्याचठिकाणी अर्धा तास तहकूब करून पुन्हा घेण्यात येईल, असे आवाहन संस्थेच्या संचालक मंडळ व प्रशासन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**सभेपुढील विषय :** १) मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे. २)सन २०२३-२४ चे संपूर्ण कम पत्रक शिफारस करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे बाबत.
३)दि. ३१ मार्च २०२३ अखेरची आर्थिक पत्रके वाचून कायम करणे. ४) संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणेबाबत. ५) सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षात कमी जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणेबाबत.
६) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत.
७) सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे.
८) आदर्श उपविधी पोट नियम दुरुस्ती करणे बाबत.
९) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षक यांची नेमणूक करणेबाबत. १०) संस्थेस ऑफिस इमारत बांधणेसाठी जागा खरेदी करणे व इमारत बांधणे बाबत.
११) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा मा.अध्यक्षांच्या परवानगीने करणे. १२) आभार प्रदर्शन व समारोप.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# वडोद बाजार येथील जनावरांचा बाजार सुरू करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे सोमवारी भरणारा जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. परिसरात लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे शासनाकडून सर्वत्र जनावरांचे आठवडी बाजार बंद करण्यात आले आहे. त्यामुळे वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार हा बंद करण्यात आला आहे. मात्र आता लसीकरणाचे प्रमाण वाढत असून वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी आता शेतकऱ्यांकडून होत आहे आठवडी बाजार जनावरांचा आठवडी बाजार बंद असल्यामुळे जनावर खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी काही शेतकऱ्यांकडून होत आहे.

वडोद बाजार येथे सोमवारी भरणारा जनावरांचा बाजार सुरू करण्यात यावा जनावरांचा आठवडी बाजार बंद होत असल्यामुळे शेतकरी व नागरिकांची गैरसोय होत आहे . जनावरांचा आठवडी बाजार लवकर सुरू करण्यात यावा . **शेतकरी मिर्झा समिउल्ला बेग**

वडोद बाजार येथे भरणारा दर सोमवारचा जनावरांचा आठवडी बाजार हा काही दिवसापासून बंद असल्यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांची गैरसोय होत आहे तर शेतकऱ्यांचे जनावरांची चोरीचे प्रमाण वाढले आहे .सोमवारचा जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्यात यावा .
**धुपाजी म्हस्के**

शेतकऱ्यांना जनावरे खरेदी करण्यासाठी अडचण येत असून सोमवारचा जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्यात यावा .
**साईनाथ काटकर शेतकरी**



## बाप्पाचे पाण्यात विसर्जन का केले जाते

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** गणपती बाप्पाला पाण्यातच का केले जाते. या मागे काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदु धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरुपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पध्दतीने कायमच दिला जातो. यंदाचा गणेशोत्सव निर्बंधमुक्त असल्याने धुमधडाक्यात साजरा करण्यात येत आहे. घरगुती गणपतीसह मंडळाच्या गणपतीमध्येही विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. आता गणपती बाप्पांचा उत्सवाचा शेवटचा दिवस जवळ आला आहे. तो म्हणजे अनंतचर्तुथी .त्यामुळे अखेर लाडक्या बाप्पाचा निरोप घेण्याची वेळ जश-जशी जवळ येत आहे तश-तशी विविध मंडळाची वेगवेगळ्या रूपातील तयारी दिसून येते. अनंतचर्तुथी म्हणजे गणपती विसर्जनाचा दिवस .दहा दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर गणपतीला पाण्यात विसर्जित करण्यात येते.गणपती विसर्जन पाण्यातच का केले जाते.यामागे काही धार्मिक कारणे आहेत. धार्मिक मान्यतेनुसार असे मानले जाते की महर्षी वेदव्यासांच्या सांगण्यावरून भगवान गणेशाने महाभारत पुराण लिहिले . महर्षी वेदव्यास यांनी सलग दहा दिवस गणपतीला महाभारताची कथा सांगितली.आणि त्यांनी ही कथा दहा तंतोतंत लिहिली. दहा दिवसांनंतर जेव्हा महर्षि वेदव्यासांनी गणपतीला स्पर्श केला तेव्हा ,त्यांना गणपतीच्या शरीरांचा अक्षरशः चटका बसला.त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते.वेदव्यासांनी त्यांना ताबडतोब जलाशयात डुबकी मारण्यास सांगितली. यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान कमी झाले. तेव्हापासून असे मानले जाते की, गणपतीचे विसर्जन हे त्यांना शीतल करण्यासाठी केले जाते. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे. ज्या गोष्टीची सुरुवात होते. तिचा शेवट हा नक्की होतो. आणि ज्याचा शेवट होतो ते पुन्हा निर्माण होते. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातुन दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासुन गणपतीची मुर्ती तयार होते. आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मुर्तीचेच करायचे नसते. तर आपल्यातील दुर्गुणांचेसुध्दा विसर्जन करायचे असते. सहसा गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्थी पर्यंत दहा दिवस बाप्पा भक्तांच्या घरी विराजमान होतात.काही जण दीड दिवस, काही जण पाच दिवस, काही जण सात दिवस तर काही जण दहादिवसांनी गणरायांचे विसर्जन करतात. असे करण्यामागे काही कारणे आहे का ? असा प्रश्न सर्वांच्या मनात येत असतो. या प्रश्नाचे उत्तर आपण जाणून घेणार आहोत. सर्वांना गणेशोत्सवाचा आनंद आणि उत्साहात सहभागी व्हायचं असतं.पण सध्या नोकरी ,शाळा, महाविद्यालय आणि इतर धावपळीमध्ये अनेक जण फक्त दीड दिवसात गणपतीचे विसर्जन करतात.पण ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामागील कारण वेगळं आहे. आणि त्याचा संबंध शेती आणि शेतकऱ्यांशी जोडला जातो. चला तर मग जाणून घेऊ या दीड दिवसाच्या बाप्पाची गोष्ट.

दीड दिवसाच्या गणपती विसर्जनाबाबत प्रसिद्ध अभ्यासक दा.कृ.सोमण यांनी एक गोष्ट सांगितली.भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भाद्रपद महिन्यात गणेश चतुर्थी दरम्यान शेतांमध्ये धान्याच्या लोंब्या हिरव्यागार पात्यातुन डोलु लागतात. गणेश चतुर्थी च्या दिवशी धरणीमातेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यापुर्वी बांधावरच गणरायांची मातीची मुर्ती तयार करून तिची पुजा केली जात असे. सुरुवातीला पुजा झाल्यानंतर त्याच दिवशी या मुर्तीचं नदीमध्ये विसर्जन केले जात असे. नंतर काळानुसार या परंपरेत बदल होऊ लागला.काही जण सुबक मुर्ती तयार करून घरी आणु लागले. आणि तिची प्राणप्रतिष्ठापना करून नंतर मुर्ती नदीत विसर्जन करीत. हळूहळू दीड दिवसांच्या गणपती पुजनाची पध्दत सुरू झाली. पण अजूनही अनेक गावांमध्ये चतुर्थी च्या दिवशीच गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. अजूनही काही ठिकाणी ही प्रथा कायम आहे. पाचव्या ,सातव्या किंवा दहाव्या दिवशी गणेशमूर्ती विसर्जन करण्याची प्रथा आहे. ते का ?याबाबत अवधूत शेंबेकर गुरुजी यांनी दिलेल्या माहिती नुसार गणपती ची प्राणप्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पुजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसांचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पुर्ण करण्यासाठी पाच,किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी विसर्जन करतात.त्यामध्ये प्रत्येकांची वेगवेगळ्या स्वरूपांची धार्मिक भावना असते. ब-याच लोकांना वाटते की गणेशाची प्राणप्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते. तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायांची प्राणप्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेए दशमीपर्यत असे दहा दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थी पासून अनंत चतुर्थी पर्यंत असे दहा दिवस गणेशोत्सव साजरा होतो.

## देवपुरातील पांडवनगर नवयुवक मित्रमंडळ गणेश उत्सवनिमित्त रक्तदान शिबिर कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दरवर्षा प्रमाणे देवपूरतील पांडवनगर येथे गणपती उत्सवा निमित्त विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवले जातात त्यात भंडारा,रक्तदान शिबिर, समाज प्रभोधन धार्मिक कीर्तन,वृक्षरोपण हे असे विविध कार्यक्रम मोठया उत्सहात घेतले जातात.
आज सहाव्या दिवशी गणेश उत्सवानिमित्त मित्र मंडळाचे प्रथम वर्ष हे रक्तदान शिबिराचे आहे तरी कॉलनी परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देऊन पहिल्याच वर्षी 50+ रक्त बॅग चे संकलन करण्यात आलेले आहे.
यावेळेस प्रमुख उपस्थिती युवासेना जिल्हा प्रमुख हरिष माळी तसेच परिसरातील नागरिक संतोष जाधव सर,जितू काका शिवगण, प्रशांत दादा कोळी, शरद दादा सिसोदे सोनार काका, भूषण कुंभार , विजय जाधव, गौरव शिवगण, बंटी पाटील, हर्षल पाटील, विकास पाटील, मुन्ना माळी, तुषार माळी, भटु महाराज दर्शन, माळी, मनीष कोळी, व समस्त पांडव नगरातील नागरिक.



## वीज कर्मचाऱ्यांच्या मनमानीमुळे नागरिक त्रस्त

### शहरात कधीही करण्यात येते लोडशेडिंग

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** 'अ' वर्ग दर्जा पर्यटनस्थळ असलेले लोणार शहर विद्युत समस्येचे माहेरघर होत असल्याचे जनमानसात चर्चिले जात आहे. मागील आठ ते दहा दिवसांपासून महावितरणच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांना अघोषित लोडशेडिंगला सामोरे जावे लागत आहे.
शहरात महावितरणच्या वतीने केला जाणारा विद्युत पुरवठा गेल्या आठ ते दहा दिवसांपासून खंडित केला जात असून, संबंधित विभाग या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून शहरातील नागरिकांना वेठीस धरत आहे. या गंभीर बाबीकडे संबंधित विभागाचे कर्मचारी तात्काळ उपायोजना न करता नागरिकांनाच दमदाटी करीत आहेत.
या गंभीर प्रकारावर तात्काळ उपायोजना करण्यात यावी, अशी मागणी शिवछत्र मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी केली आहे. सध्या सर्वत्र पावसाळ्याचे दिवस असताना रात्रीच्या



वेळी डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने शहर व तालुक्यात मलेरिया, डेंग्यू हिवताप यांसारख्या आजारांचे रुग्ण आढळून येत आहे. यातच रात्रीच्या वेळी विद्युतपुरवठा खंडित होत असल्याने लहान व वयोवृद्ध नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहरामध्ये कोणत्याही प्रकारच्या भारनियमनाचा नियम नाही. परंतु, महावितरणचे वरिष्ठ अधिकारीच याठिकाणी जागेवर नसल्याने कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कोणाचेही बंधन नाही. त्यामुळे या विभागातील कर्मचारी मनमानी करत आहेत.
दरम्यान, त्यांच्या या मनमानीमुळे नागरिकांना अघोषित भारनियमनाला सामोरे जावे लागत आहे. जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन भारनियमन बंद करावे, अशी मागणी शिवछत्र मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.



## का रे घना

का रे घना रूसलास असा
गरजलास तर खरा,
का नाही रे बरसलास
जीव आमचा तरसला
का नाही रे कोसळलास
का लावलास जीवाला घोर
थकला नाचूनी रानात मोर
ओढ तुझी लागलेली साऱ्यांना
का नाही रे येऊन भेटलास
सारे आभाळ भरुन आले होते
का रे दुरूनच हात करून गेलास
का रे घना रूसलास असा
गरजलास तर खरा,
का नाही रे बरसलास...
सौ. प्रियंका गौरव जावळे

## विघ्नहर्ता

शंकर-पार्वती पुत्र
गणपती तुझे नाम,
बासरी वाजविणे
आवडीचे हे काम.!

हाती सुदर्शनचक्र
संगे वाजणारा शंख,
मुकुट शोभे मस्तकी
कर्ण वाटती पंख.!

तुझा पाठीराखा
मोरपिस सप्तरंगी,
मानाने खांद्यावर
उपरण गुलाबी रंगी.!

नयन तुझे एकाग्र
दागिने देही फार,
चमकून उठे सुवर्ण
गळ्यामधील हार.!

मराठमोळी संस्कृती
महाराष्ट्राच्या गणेशाची,
चाहूल सर्व ठिकाणी
तुझ्याच उत्सवाची.!

© भूषण सहदेव तांबे
वडाळा (पूर्व) मुंबई
मोबाईल नंबर: ९०२९२५८०३८

## आषाढी

नाही केला धर्म, भक्ती
नाही केली तुझी प्रीती
आता झाली उपरती
विठ्ठलाच्या ठायी गती

संत,महात्म्यांना सुलभ
जसा असशी निरंतर
लाडके लेकरु अवखळ
मज आता करी जवळ

केली वारी,केली एकादशी
नको आता येणे जाणे
देऊनी विठ्ठलाच्या पायी मिठी
घडो पैलतीर गाठणे

पुरे देवा हुलकावणी
मोड जन्म मरणाची रुढी
भेटी पडु देई आता
पुरी होवो जीवाची आषाढी

@ सविता बोराळकर,
परभणी

## कृष्ण तुझा...

कृष्ण तुझा कृष्ण माझा
गोकुळात तर सर्व सखा
गोपिकेच्या तो ध्यानी मनी
रधिकेच्या मात्र स्वप्नी
काय लागतं कृष्णाला माग
काहीं घडलं कृष्णाला सांग
दही दुध लोणी त्याला खाऊ दे
प्रसाद अर्पण श्रीहरी ला होऊ दे
बलराज संघई
9420015108

## आर्जव

वंदितो तुज हे गणराया
शौर्य तुझे वंदितो तव चरणी
नाम ध्यान जपध्यास तुझा
कंठी सजली माळ
मोतियांनी..॥१॥

प्रथम स्थानी तुझे पुजन
मूर्ती दिसे राऊळी शोभूनी
चौसष्ट कलांचा तू कैवारी
सुरवर चौदा विद्यांचा धनी..॥२॥

रणी फुंकले शंख नारदा
सरस्वतै तव वीणा धारिणी
अचल भूजल सदा सर्वदा
योग अनुयोग दिलेस झणी..॥३॥

भ्राता कार्तिकेय धनुर्धर
शर्वरीसमपुज्य जननी
पिता कैलासवासी निळकंठ
रिद्धि सिद्धि सहचारिणी..॥४॥

देवाधिदेव तू अधिपती
साष्टांगभावे आर्जव मनी
गणात देव तू गणपती
आळवितो तुज हेरंब भजनी..॥५॥

...©प्रदीप बडदे, नवी मुंबई.
मो. ९५९४०२७९९५

## अनोखी जिद्द

याही वर्षी तुझे केले आम्ही
थाटात जंगी मस्त रे स्वागत
कोरडा दुष्काळ पाडून असे
काय वाढले सांग जीवनात ?..१

नित्य नव्याने जगतोय दिवस
दहा दिवसांचा तुझा सहवास
खडतर वाटेवर हो चालतांना
देई आम्हा दृढ आत्मविश्वास...२

नाना प्रश्नांनी आम्हास वेढले
डोळे साथ, डेंग्यू सारखे रोग
एकामागोमाग येतात धावून
कधी येतील सुखाचे रे योग...३

जो तो स्वार्थी दुनिया जगतो
चालतो जीवनी विषाची वाट
तुझा महिमा अपार जीवनात
चढूया कष्टाने प्रगतीचा घाट...४

सुख दुःख याचने प्रसंगात
तुझा आशिष असावा पाठी
संकटाना झेलून जिंकू जग
झेलू किती मग संकट काठी ?...५

जिद्द आमची अनोखी आहे
गगनी घेई उंच गरुड भरारी
विश्वात भारत नाव कोरण्या
स्वभाव आमचा जगी करारी...६

सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे,४४



## शेतकरी बापाची मुले


मुलाने गावतच भरतीची तयारी केली,
तेथे मार्गदर्शक करणारी व्यक्ती नाही सापडली..
अर्धवटच भरतीची तयारी झाली,
भरतीच्या वेळेस माझ्या शेतकरी बापाची मुले भरती
पासून वंचितच राहीली ॥1॥
गावात राहून नाही होत भरतीची तयारी,
ही गोष्ट त्याला समजली..
त्याने पुढे शहरात जाऊन प्रशिक्षण
देणारी संस्था पाहिली,
आन भरतीच्या वेळेस माझ्या शेतकरी
बापाची मुले भरतीसाठी सज्ज झाली ॥2॥
म्हणे मेट्रो चालु झाली,
बुलेट ट्रेन चालु झाली..
देशाने आधुनिकतेकडे प्रगती केली,
पण भरतीच्या वेळेस पैसे अभावी माझ्या
शेतकरी बापाची मुले जनरल डब्यातच
बसुन गेली ॥3॥ रात्रंदिवस काही तास काम करून
भरतीची तयारी केली,
मैदानी चाचणीला गेल्यावर रोडवरच झोप लागली,
झोपेत मच्छर-चिलट- थंडीने वेगळीच चाहुल दिली,
त्या भरतीच्या वेळेस माझ्या शेतकरी बापाच्या
मुलांनी ती भरती कायमच स्मरणात ठेवली ॥4॥
शेवटी निकाल लागल्यावर,
त्या यादीत आपलं नाव दिसल्यावर,
मुलाच्या आयुष्याला अनोखी कलाटनी भेटली,
हे माझ्या शेतकरी बापाला समजल्यावर,
त्यांची डोळे सुखी अश्रुने भरून गेली ॥5॥
शेवटी शेतकरी बापाची मुले भरती झाली,
शेवटी शेतकरी बापाची मुले भरती झाली ||6||
जय जवान जय किसान
कवी: श्रीराम शिंदे

## उंच माडी

माड्यावर, माड्या उंचच, उंच
अन् कोणाला साधं घर नाही
माणूस, माणसासारखा दिसते खरं
पण, माणसाला आधार देत नाही
एकाची माडी, दुसऱ्याची तुटकी झोपडी
एकाला खायला पोटभर अन्न नाही
कुत्रा बसते लाखोच्या सोफ्यावर
अन् भिकाऱ्याला दारात प्रवेश नाही
एकाची माडी भारी चमकते
अन् वरचेवर चढत जाते
मायबाप रस्त्यावर राहती
मुलगा चारचाकीने निघून जाते
माडी सजली अन् नातेवाईक वाढले
मायबाप झाले हो परके
एक खोली माडीत दिसत नाही
जन्मदात्यांनाही विसरून गेले
अशी माडी कोणत्या कामाची... ?
तिची किंमत झोपडी पेक्षा कमी
ज्या घरी मायबाप दिसत नाही
ते पडतील का कोणाच्या कामी... ?
सौ. संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा, जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

## श्री गणेश वंदना

प्रथम तुजला वंदन करितो देवा गणेशा
कार्यारंभी तुजला नमिती देवा गजानना
सर्वांचा तू देव असशी हे सिध्दीविनायका
देवाधिपती तू असशी देवा श्रीसिध्दीगणेशा
तूच असशी सृष्टीदाता
तूच असशी दृष्टीदाता
तूच असशी जीवनदाता
साष्टांग नमन माझे तुजला देवा!
भूतली या तुझिया कृपेने
अवतरलो जगती मी देवा
सेवा करण्या अखंड तुझी रे!
असूदे खूप बळ अंगी माझ्या, देवा!
सकल गुणांचा तूच अधिपती
सर्व विद्यांचा तूच रे! श्रीपती
विद्यारंभे प्रथम तूलाच नमिती
प्राप्त होण्या जीवनी श्रीसुखशांती
हृदयी असूदे सदैव तुझेच चिंतन
शुध्द राहूदे देवा मम अंत:करण
अधिर झालो देवा मी तुझ्या दर्शना
हीच मम आस तव चरणी गजानना
काव्यरचना
मधुकर ए. निलेगावकर


सुखाची हाळी

आलास ना; आता कोसळ जरा शहाण्यासारखा
लय दिसांनी बघतोय तुझं
सावळ्या घनांचं हे घदगर्द रुप
गेल्या हंगामी पन; तू अशीच ओढ लावलेली
निदान या वरशी तरी शिवारांमधून
लहरु दे भरलं धान, होऊ दे आबादानी
पेपरातल्या त्या फासा-विसाच्या बातम्या
थंड करताय रे जीवाला
पन एक सांगतो, हात नाही टेकले आम्ही
लढू; जीवापार लढू
घामच काय; रगत बी गाळू
फकस्त तुझी मेहेरबानी हवीये गड्या...

जित्राबांचा पोळा सुना सुनाच गेला की रे
बाप्पाचं स्वागत बी ढोल-वाज्यासंग राहिलंच
निदान; दसऱ्याला तरी सोनं लुटू दे बहरचं
तुझ्या भरल्या सरींचे अश्व उधळू दे चौखूर
पन तुझी ती बेभान ढगफुटी नकोय बरं बाबा!
धाड धाड करत तू डोंगर दऱ्यात कोसळतो ना
वाटतं; तो भोळा तिनयनी तांडव करतोय
गांव-कुसांवर तू रुमझुम रुमझुम बरसतो ना
त्या कान्हयाच्या बांसरीचे सुरच जसे झरतात
रुजाच ना तू... मग; हो वाऱ्यावर स्वार
दूर पहाडांवर तू नागडा नाचतोस ना
समेवर आलेल्या मोरावानी भासतो मला
झाडाझाडोऱ्यातून सनान् भिरारतोस ना
माझ्या रखमेचा रूसवा दिसतो बघ तुझ्यात
तू असाच भिरभिर, नाच; दाही दिशांना चिंब कर
पाखरांच्या ओठून जरा येवू दे सुखाची हाळी
भेगाळलेल्या या काळ्याआयीच्या उदरातून
तरारू दे हिरवे कोंब सृजनाचे.

- मनोहर मंडवाले, कल्याण. 8879123236


## आले आले गणराज

आले आले गणराज, आज आनंदाचा सण...
बाप्पा तुझ्या स्वागताला, कितीं आतुरले मन...
कितीं आतुरले मन, केली साजिरी आरास...
बाल गोपाळांचा आज, आला आनंद भरास...
आला आनंद भरास, होता आगमन तुझे...
रूप गोजिरे पाहतां, नेत्र सुखावले माझे...
नेत्र सुखावले माझे, केली पूजेची तयारी...
ढोल ताशांच्या गजरी, आली बाप्पांची ही स्वारी...
आली बाप्पांची ही स्वारी, सजे पूजेचे हे ताटं...
कितीं- कितीं करू आजं, गणराजा तुझा थाटं...
गणराजा तुझा थाटं, आज साऱ्या जगतात...
कितीं शोभतेय बाप्पा, मूर्ती तुझी मखरात...
मूर्ती तुझी मखरात, करू पूजा नि आरती...
तुझ्या आगमने आज, आनंदली ही धरती...
आनंदली ही धरती, दिन तुझ्या कौतुकाचे...
नैवेद्याच्या साठी केले, ताटं गोड मोदकाचे...
ताटं गोड मोदकाचे, तुला आवडते फार...
बाळ पार्वतीचा तान्हा, दिसे कितीं सुकुमार...
दिसे कितीं सुकुमार, रूप तुझे हे देखणे...
सुखी ठेव सकलांना, हेचि माझे रे मागणे...
सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे -चोपडे
परभणी.९८२३०६६६०६

## माझा मराठवाडा

पाषाणावर पिंपळापरी, जगतोय मराठवाडा
दुष्काळाच्या वणव्यात, होरपळतोय मराठवाडा
घोषणांच्या चिंब पावसात, रडतोय मराठवाडा
बळीराजाचा फास सोडण्या, झटतोय मराठवाडा
अजिंठ्याची लेणी कोरतो, काळजात मराठवाडा
पितळखोरा अन् वेरुळात, शांती बुद्ध मराठवाडा
देवगिरीचा किल्ला सांगतो, अभेद्य मराठवाडा
गौताळयाच्या वनात खुलतो, हिरवा मराठवाडा
निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, गातोय मराठवाडा
शंकरस्वामी बहिणाईसंगे, आषाढ वारीत मराठवाडा
गोदा शिवना पूर्णा मांजरा, दुधनेत मराठवाडा
पाण्यासाठी तळमळतोय, तहानलेला मराठवाडा
स्वराज्याला देण्या प्रेरणा, तुळजापुरी मराठवाडा
छत्रपतींचे माहेर शोभतो, घृष्णेश्वरी मराठवाडा
'मिलिंद' व्हावा लेक म्हणून, झटतोय मराठवाडा
गीतामृत जगा पाजण्या, सिद्ध ज्ञानदेव मराठवाडा
आद्य मराठी सरला बेटी, म्हाइंभट मराठवाडा
अस्पृश्यता गोदेत गाडतो, शांतीब्रम्ह मराठवाडा
गुरूग्रंथात शोभे अभंग, नामयाचा मराठवाडा
जनाईच्या पिठात भेटतो, पांडुरंगास मराठवाडा
देव तुडवितो माती, पाहुनी गोरोबा मराठवाडा
साई श्रद्धा अन् सबुरी, सांगे पाथरीत मराठवाडा
दख्खनचा ताज शोभतो, बावन्न दरवाजी मराठवाडा
नांदेडी गुरुद्वारा अन् जांब समर्थी मराठवाडा
महाराष्ट्रात बिनशर्त सामील,आज जरी मराठवाडा
अजूनही का मागासलेला, माझा प्रिय मराठवाडा.

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
जि.छ.संभाजीनगर
मो.९४०३३८४८८९